सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २० नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २२४ | पाने : ८ | किंमत रु. ६/-



## थोडक्यात...

### संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढणार



संगमनेर : संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीत महायुती म्हणून लढण्याची तयारी असतानाही स्थानिक शिवसेना आणि भाजपच्या नेतृत्वाने गोंधळ घालून राष्ट्रवादी काँग्रेसला पद्धतशीरपणे डावलले असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी केला आहे. यामुळे संतप्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने आता नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदाच्या जागा स्वबळावर लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. राष्ट्रवादीच्या या निर्णयामुळे संगमनेरमधील शिवसेना आणि भाजपची डोकेदुखी वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपचे माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत महायुतीच्या जागावाटपाबद्दल बैठक झाली होती. या बैठकीत डॉ. विखे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला किती जागा द्यायच्या, याबाबत स्पष्ट सूचना दिल्या होत्या आणि जागा देण्यास सहमती दर्शवली होती. मात्र, त्यानंतर येथील स्थानिक शिवसेना आणि भाजपच्या नेत्यांनी जाणीवपूर्वक गोंधळ घातला आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनी जागा देऊनही राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीमध्ये समाविष्ट करून घेण्यात आले नाही. डॉ. विखे पाटील यांच्यासारख्या मोठ्या नेत्याने शब्द दिला असतानाही स्थानिक शिवसेना आणि भाजपने आम्हाला डावलले असून शिवसेना व भाजपा उमेदवारांचे अर्ज भरत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कोणत्याही प्रकारचा संपर्क करण्यात आला नाही असे थेट आरोप कपिल पवार यांनी केले आहेत.

### केंद्र सरकारने रेशन यादीतून काढली २.२५ कोटी अपात्र नावं!



मुंबई : केंद्र सरकारद्वारे समाजातील गरीब कुटुंबांना योग्य अन्न पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी रेशन योजना लागू केली आहे. याअंतर्गत, रेशन दुकानांमध्ये गरीब कुटुंबियांना तांदूळ, गहू आणि इतर धान्य व इतर वस्तू स्वस्त दरात दिले जातात. जरी ही योजना मुख्यत: अत्यल्प उत्पन्न गटांसाठी असली तरी, काही अपात्र व्यक्तींनी देखील याचा फायदा घेतला होता. अशा अपात्र लाभार्थ्यांविरुद्ध केंद्र सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. गेल्या काही महिन्यांतच २.२५ कोटी लोकांची नावे रेशन यादीतून वगळण्यात आली आहेत. सरकारचा दावा आहे की या कारवाईमुळे गरजू लोकांपर्यंतच मोफत धान्य पोहोचेल. अपात्र लाभार्थ्यांमध्ये अनेकांची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे निष्पन्न झाले आहे. काहींकडे महागडी चारचाकी गाडी, काहींचं मासिक उत्पन्न सरकारी मर्यादेपेक्षा जास्त तर काही कंपन्यांचे संचालक होते. यामध्ये असेही लोक होते ज्यांचा मृत्यू झाल्यानंतर देखील त्यांची नावं रेशन यादीत राहिली होती. अशा प्रकारे, अपात्र लाभार्थ्यांनी वर्षानुवर्षे मोफत धान्य घेतले होते. केंद्रीय अन्न मंत्रालयाने आधार कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, वाहन नोंदणी कागदपत्रे यांची तपासणी केली आणि त्यावर आधारित अपात्र लाभार्थ्यांची यादी राज्य सरकारकडे दिली.

### मुंबईतील चारकोप परिसरात दिवसाढवळ्या गोळीबार, एक जण गंभीर



मुंबई : मुंबईतील चारकोप परिसरात आज दुपारी २ वाजता गोळीबार झाला. या गोळीबारात एक व्यक्ती जखमी झाला असून त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. गोळीबाराची ही घटना दिवसाढवळ्या घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे आणि नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. दुचाकीवरून आलेल्या एका अज्ञात व्यक्तीने केलेल्या गोळीबारात फ्रेडी डिलिम्स नावाच्या व्यक्तीच्या पोटात २ गोळ्या लागल्या. कांदिवलीच्या ऑस्कर रुग्णालयात जखमीवर उपचार सुरु आहे. गोळीबाराची माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहोचले असून ते याबाबत सखोल तपास करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी सुरक्षेचे कडेकोट व्यवस्थापन केले असून आरोपींचा शोध सुरू केला आहे. गोळीबाराचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. चारकोप परिसर एक वर्दळीचा भाग आहे आणि इथे वाजवी प्रमाणात रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते. दिवसाच्या उजेडात अशी हिंसक घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी भीती पसरली आहे.

## नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून पीडितांना न्यायाची हमी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# नवीन फौजदारी कायद्यांवरील ५ दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन

### गुन्हे सिद्धतेचा दर ९० टक्क्यांपर्यंत नेण्याची नवीन फौजदारी कायद्यांमध्ये क्षमता

मुंबई, दि. १९ : ब्रिटिशकालीन फौजदारी कायद्यांमध्ये डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील पुरावे गृहीत धरण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे पुरावे नष्ट करून आरोपी सुटत होते. परिणामी, विविध गुन्ह्यांमधील पीडितांना न्यायासाठी बराच कालावधी लागत असे. आता मात्र केंद्र शासनाने लागू केलेल्या नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे पीडितांना विशिष्ट कालावधीत न्यायाची हमी मिळत आहे, अशी माहिती असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



आझाद मैदानावर नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित पाच दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतावर राज्य करण्यासाठी भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा ब्रिटिशांनी तयार केला होता. पीडितांना जलद गतीने न्याय मिळवून देण्याची व्यवस्था या कायद्यांमध्ये नव्हती. मात्र ही व्यवस्था या नवीन कायद्यांच्या निर्मितीने बदलून आरोपींना कठोर शासन आणि पीडितांना न्याय देणारी ठरत आहे. लोकशाहीत निवडून आलेले सरकार हे जनतेचे ' ट्रस्टी' असते. त्यानुसार या कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन कायदे हे शिक्षेपेक्षा न्यायावर जास्त भर देणारे आहे.

२०१३ मध्ये राज्याचा गुन्हे सिद्धता दर नऊ टक्के होता, तो आता ५३ टक्क्यांवर आला आहे. या नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारे हा दर निश्चितच ९० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकता. शासनाने १४ शासन निर्णयाद्वारे पोलीस दलात विविध सुधारणा केल्या आहेत. पोलीस दलाचे नियुक्ती नियम आणि नवीन आकृतीबंध करण्यात आला आहे. नवीन आव्हानांना सज्ज असणारे पोलीस दल निर्माण करण्यात येत आहे. मागील काही वर्षात ५० हजार पेक्षा जास्त पदभरती करण्यात आली आहे. आपले पोलीस दल देशात क्रमांक एकचे आहे, ते आता जगातही अव्वल करण्यावर भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सायबर गुन्हेगारीचे नवीन आव्हान आहे. राज्यात देशातील सर्वात चांगली सायबर लॅब आहे. मागील काही दिवसात सायबर बुलिंगपासून ६० पेक्षा जास्त मुलींना वाचविण्यात यश आले आहे. न्याय सहाय्यक मोबाईल व्हॅन्सच्या माध्यमातून पुराव्यांचे पारदर्शकरित्या पडताळणी करण्यात येत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे न्याय सहाय्यक प्रयोगशाळांकडे असलेल्या नमुन्यांची 'पेंडन्सी' कमी होत आहे. नवीन फौजदारी कायद्यांमध्ये कुठल्याही पोलीस स्टेशनअंतर्गत गुन्हा नोंद करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हा करून दुसऱ्या राज्यांमध्ये पळून जाणारा गुन्हेगार आता सुटू शकणार नाही. ई-एफआयआर नोंदविण्याची सुविधाही नागरिकांसाठी उपलब्ध आहे.

### समाजातील विकृत मानसिकतेला कठोर शिक्षेची नवीन फौजदारी कायद्यांमध्ये ताकद -उपमुख्यमंत्री अजित पवार

काळानुरूप नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पुरावे सुरक्षित ठेवून गुन्हेगारांना कारागृहापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था या नवीन फौजदारी कायद्यांनी निर्माण केली आहे. नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून समाजामध्ये असलेल्या विकृत मानसिकतेला कठोर शिक्षा करण्याची ताकद निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

# नितीश कुमार दहाव्यांदा घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ

### मोदी-शाह यांच्यासह भाजपाशासित मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती- सुरक्षेची जबाबदारी एसपीजीकडे

पाटणा, १९ नोव्हेंबर - बिहारमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणूक निकालानंतर नितीश कुमार (जदयु) आणि भाजपा पुन्हा एकदा संयुक्त सरकार स्थापन करण्यासाठी सज्ज झाले आहेत. महत्वाचे म्हणजे नितीश कुमार यंदा दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असून उद्या, गुरुवारी पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर हा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. त्यापूर्वी, आज एनडीएच्या घटक पक्षांची महत्वाची बैठक पार पडली. ज्यात नितीश कुमार यांना विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आले आहे.

एनडीए आमदारांची बिहार विधानसभेच्या इमारतीत बैठक झाली. भाजप नेते सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला,



जो एकमताने मंजूर करण्यात आला. त्यानंतर नितीश कुमार यांनी राजभवनात जाऊन राजीनामा दिला आणि सरकार स्थापनेचा दावा केला. उद्या सकाळी भव्य शपथविधी सोहळ्यात ते दहाव्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि विजय सिंह उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर शपथविधी समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे. एनडीएचे अनेक वरिष्ठ नेतेही या समारंभात सहभागी होतील. स्वतः नितीश कुमारांनी मंगळवारी या सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी गांधी मैदानाला भेट दिली होती.

शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे भजन लाल शर्मा, महाराष्ट्राचे देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याची माहिती आहेत. याशिवाय पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार विजेते, शास्त्रज्ञ, साहित्यिक आणि इतर उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे एसपीजी गांधी मैदानाच्या सुरक्षेची जबाबदारी घेत आहे. २५० हून अधिक दंडाधिकारी, २५० पोलिस अधिकारी आणि २५०० हून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. गांधी मैदानाभोवती असलेल्या उंच इमारतींवर स्नायपर्स तैनात करण्यात आले आहेत.

शपथविधी सोहळ्यासोबतच, एनडीए गांधी मैदानावर देखील शक्तीप्रदर्शन करणार आहे. तीन लाखांहून अधिक लोकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. जदयू, भाजपा, आरएलएसपी आणि एचएएमचे कार्यकर्ते आणि नेते यासाठी तयारी करत आहेत.

# आंध्रप्रदेशात ७ माओवादी ठार, ५० हून अधिक अटकेत

हैदराबाद, १९ नोव्हेंबर : आंध्र प्रदेशमध्ये कुख्यात माओवादी माडवी हिड्मा याच्या मृत्यू नंतर दुसऱ्या दिवशीही मारेदुमिल्ली परिसरात झालेल्या चकमकीत ७ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती मिळाली आहे. आंध्र प्रदेश गुप्तचर विभागाचे एडीजी महेश चंद्र लड्डा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की ठार झालेल्या नक्षल्यांमध्ये ३ महिला देखील आहेत. सर्वांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ठार झालेल्या माओवादींपैकी एक मेतुरी जोखा राव उर्फ टेक शंकर होता. तो श्रीकाकुलमचा रहिवासी होता आणि आंध्र-ओडिशा सीमेवरील कामकाजाची जबाबदारी पाहत होता. तो तांत्रिक बाबींमध्ये पारंगत होता आणि शस्त्रसाठा व संप्रेषण तंत्रज्ञानावर त्याची चांगली पकड होती. एडीजी लड्डा यांनी सांगितले की शंकर मागील २० वर्षांपासून नक्षलवादी चळवळीशी जोडलेला होता आणि प्रत्येक सुरक्षा मोहिमेदरम्यान आपले ठिकाण बदलत असे. त्यांचा अंदाज आहे की नक्षलवादी चळवळीला पुन्हा बळकटी देण्यासाठीच शंकर दक्षिण भारतातील या राज्यात आला होता. यासोबतच, आंध्र प्रदेश पोलिसांनी राज्यातील विविध भागांतून सुमारे ५० भाकप (माओवादी) कार्यकर्त्यांना अटक केली आहे. कृष्णा, एलुरु, एनटीआर विजयवाडा, काकिनाडा आणि डॉ. बी.आर. आंबेडकर कोणासीमा या जिल्ह्यांत हा मोठा अभियान राबवण्यात आला. या कारवाईमुळे माओवादी संघटनेच्या दक्षिण बस्तर व दंडकारण्यातील नेटवर्कला मोठा फटका बसला आहे.

## देशातील २७२ मान्यवरांचे खुले पत्र, पत्रातून राहुल गांधींचा जाहीर निषेध

नवी दिल्ली : २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेसची निवडणुकीतील पराभवाची रेषा सातत्याने खाली उतरते आहे. विविध प्रयत्नांनंतरही काँग्रेसला विजय मिळवता आलेला नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी वोटचोरीचा मुद्दा उपस्थित केला आणि निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांवर गंभीर आरोप केले. राहुल गांधींच्या या आरोपांवर देशभरातील बुद्धीवंतांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर २७२ नामवंत विचारवंतांनी एक खुलं पत्र लिहित, राहुल गांधी यांच्या आरोपांवर कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या पत्रात, बुद्धीवंतांनी म्हटले आहे की, आम्ही भारतीय



लोकशाहीवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे चिंतित आहोत. त्यांनी असेही सांगितले की, राजकीय मंडळी लोकांचे मन भडकवण्याऐवजी तथ्यहीन आरोप करून फुकटचे राजकारण करत आहेत. या पत्रामध्ये बुद्धीवंतांनी निवडणूक आयोगावर झालेल्या आरोपांवर आपली नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, आता निवडणूक आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेवर आरोप करून त्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याशिवाय, भारतीय सैन्याच्या शौर्याबद्दल शंका उपस्थित करणे, न्यायव्यवस्थेची निष्पक्षता आणि संसद व घटनात्मक पदांवर बसलेल्या व्यक्तींविषयी शंका घेणे हे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. बुद्धीवंतांनी निवडणूक आयोगाच्या इमानदारीची आणि प्रतिष्ठेची वकिली केली असून, संस्थेने षडयंत्रकारकांच्या विरोधात तडजोड न करता आपली इमाने आणि प्रतिष्ठा जपणे आवश्यक असल्याचे सांगितले.

# नाराज एकनाथ शिंदे अमित शहांच्या भेटीला

### तिकडे उच् फडणवीस आणि अजित पवारांची तातडीची गुप्त बैठक

मुंबई : राज्यात सत्ताधारी महायुतीत (चरहूींळ) सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जागावाटपावरून महायुतीत वादाची ठिणगी पडली असून, या वादाचा भडका बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत पाहायला मिळाला. नाराजी व्यक्त करण्यासाठी शिवसेनेच्या शिंदे गटाच्या सर्वच मंत्र्यांनी या मंत्रिमंडळ बैठकीकडे पाठ फिरवली होती. या शक्तिप्रदर्शननंतर लगेचच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि महायुतीतील आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. नाराजी दूर करण्यासंदर्भात दोन्ही नेत्यांकडून चर्चा झाली असली, तरी शिंदे गटाचे समाधान झाले नसल्याचे संकेत मिळत आहेत. कारण, फडणवीस यांच्या भेटीनंतर अवघ्या दोनच दिवसांनी म्हणजेच आज, एकनाथ शिंदे थेट दिल्लीसाठी रवाना झाले. दिल्लीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा (-ाळीं डहरह)



यांची भेट घेतली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आणि महायुतीतील जागावाटपावरून निर्माण झालेल्या तणावावर या दोन नेत्यांमध्ये निर्णायक चर्चा झाली. या दिल्लीवारीमुळे महायुतीतील राजकीय घडामोडींना आता वेग आला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या दिल्लीत दाखल झाले आहेत. दिल्लीत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह वरिष्ठ भाजप नेत्यांची भेट घेऊन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील वादावर चर्चा केली. दिल्लीतील भेटीगाठी संपल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बिहार दौऱ्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे, कारण बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी एकनाथ शिंदे यांनी बिहारमध्ये जाऊन दोन सभा घेतल्या होत्या. बिहारमध्ये एनडीए आघाडीच्या विजयाबद्दल अभिनंदन करण्यासाठी एकनाथ शिंदे बिहारला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. हा दौरा राष्ट्रीय स्तरावर एनडीएच्या घटकांशी असलेले आपले संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने महत्त्वाचा ठरू शकतो. महायुतीतील वाद आणि जागावाटपाच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, एकनाथ शिंदे यांचा दिल्ली आणि त्यानंतरचा बिहार दौरा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

राज्याच्या सत्ताधारी महायुतीमध्ये सध्या अंतर्गत कलह टोकावर पोहोचला असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेना शिंदे गटाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे वाढती नाराजी घेऊन दिल्लीला रवाना झाल्याचे कळताच, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारी घटना घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची तातडीने वर्षा निवासस्थानी गुप्त बैठक पार पडली. विश्वासनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत प्रामुख्याने शिवसेना पक्षातील (शिंदे गट) मंत्री आणि एकनाथ शिंदे यांची वाढत असलेली नाराजी कशी दूर करायची, यावर सविस्तर चर्चा झाली. एवढेच नाही, तर एकनाथ शिंदे यांची नाराजी वाढत गेलीच, तर पुढील राजकीय पाऊल काय असावे या संभाव्य परिस्थितीवर देखील दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. त्यामुळे, महायुतीत तीनही पक्षांमध्ये आलबेल नसल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे.

# बिहार विधानसभेत एनडीएच्या मंत्र्यांची आकडेवारी निश्चित, मात्र अध्यक्षपदासाठी पेच

पाटणा: बिहार विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर आता एनडीएकडून सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आज राज्यपालांना भेटून मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सादर करतील आणि विधानसभा बरखास्त केली जाईल. त्यानंतर, बिहारच्या पुढील पाच वर्षांच्या भवितव्यासाठी नवीन मंत्रिमंडळ स्थापन केले जाणार आहे. ज्याचा शपथविधी २० नोव्हेंबर रोजी होईल. बिहारच्या राजकारणात मंत्री नितीश कुमार दहाव्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. दरम्यान एनडीएतील मित्रपक्षांमध्ये कोणाला किती जागा मिळणार याची आकडेवारी समोर आली आहे.



बिहार निवडणूकीत भाजपला ८९, तर जेडीयूला ८५ जागांवर यश मिळाले. भाजपला जरी चार अधिक जागांवर यश मिळाले असेल तरी दोनही मित्रपक्षांमध्ये मंत्र्यांचा आकडा समान आहे. एनडीएमध्ये असलेल्या भाजप, जनता दल संयुक्त, लोक जनशक्ति पार्टी (रामविलास), हिंदुस्तानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा या मित्रपक्षांमध्ये किती जागा वाटल्या जाणार याचा आकडा निश्चित झाला आहे.

कोणत्या पक्षाला किती मंत्रीपदं मिळणार ?

भाजप - १५
जनता दल संयुक्त - १४
लोक जनशक्ति पार्टी (रामविलास) - ३
हिंदुस्तानी अवाम मोर्चा - १
राष्ट्रीय लोक मोर्चा - १

बिहार विधानसभेतील मंत्र्यांची आकडेवारी समोर आली असून कोणाला कोणते मंत्रीपद देण्यात येणार यावर चर्चा सुरू आहेत. ज्यात जेडीयू आणि भाजपच्या जागा अधिक असल्याने विधानसभा अध्यक्ष पदावरुन पेच निर्माण झाला आहे. कारण दोनही पक्षांना विधानसभा अध्यक्ष पद हवे आहे. यावर चर्चा करण्यासाठी जेडीयू आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची दिल्लीत भेट झाली. या चर्चेला जेडीयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय कुमार झा, केंद्रीय मंत्री ललन सिंह, केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा समावेश होता.

विधानसभा अध्यक्षपदासाठी विधानसभेत सगळ्यात मोठा पक्ष आम्हीच असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. तर विधान परिषदेचे अध्यक्षपद भाजपकडे असल्याने विधानसभेचे अध्यक्षपद आम्हाला मिळावं, असा युक्तिवाद जेडीयूकडे करण्यात आला आहे. जेडीयूकडून विधानसभा अध्यक्ष पदासाठी विजय चौधरी आणि श्रवण कुमार ही नावे स्पर्धेत आहेत. तर भाजपकडून प्रेम कुमार यांचं नाव आघाडीवर आहे.

विधानसभा अध्यक्षपद महत्त्वाचे का? विधानसभा अध्यक्षांकडे अनेक महत्त्वाचे अधिकार असतात. आमदारांच्या निलंबनापासून ते कोणत्या सदस्यांना किती काळ बोलू द्याचे निर्णय विधानसभा अध्यक्ष घेतात. महाराष्ट्रात २०२० च्या विधानसभा निवडणूकीत विधानसभा अध्यक्ष कळीचा विषय होता. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी सुरुवातीला विधानसभा अध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली. पण काही कालावधीनंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर या पदासाठी निवडणूकच झाली नाही. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वातील महाविकास आघाडीने हे पद रिक्तच ठेवले. याची जबर किंमत सरकारला चुकवावी लागली. कारण, शिवसेनेत फूट पडून सरकार कोसळलं तेव्हा विधानसभेचे अध्यक्ष पद रिक्त होते. याचा फायदा भाजप, शिंदेच्या गटाला झाला.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्या अधिपत्याखाली विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ व २२ नोव्हेंबर २०२५ रोजी विलासराव देशमुख फाउंडेशन स्पोर्ट्स ग्राउंड, न्यू एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

डीबीएटीयू अंतर्गत असलेल्या सर्व संलग्न महाविद्यालयांचा या ३९; मेगा स्पोर्ट्स इव्हेंट३९; मध्ये सहभाग असणार आहे. यावर्षीची ही क्रीडा स्पर्धा भव्य, उत्साहवर्धक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. स्पर्धेचा शुभारंभ सोहळा २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास प्रवीण सरदेशमुख, किरण जाधव, समद पटेल, विजय देशमुख, सीए ऋषिकेश पाटील, रवींद्र काळे, संजय माने, सचिन गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे आणि क्रीडा समन्वयक प्रा. विक्रम वाघमारे यांनी लातूर, नांदेड, सोलापूर, धाराशिव, बीड, परभणी आदी जिल्ह्यांतील सर्व सहभागी पथकांना आमंत्रण दिले आहे.



# लातूरमध्ये अनधिकृत होल्डिंगचा प्रश्न गंभीर

## ‘एनएसयूआय’चा महापालिकेला अल्टिमेटम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरात अनाधिकृतपणे लावण्यात आलेल्या होल्डिंग्स



आणि युनिपोलच्या विरोधात लातूर जिल्हा छडणख ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहर महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी ही जाहिरातफलक उभारण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

एनएसयूआय पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, पालिकेचे नियम धाब्यावर बसवून शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होल्डिंग्स झळकत आहेत. या प्रकरणी महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न केल्याने शहरातील नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण पसरले आहे. संघटनेतर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन दुजाभाव न करता तातडीने अनधिकृत फलक हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई न केल्यास लातूर जिल्हा एनएसयूआयकडून महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

शहर स्वच्छता, नियोजन आणि कायदेपालनाच्या दृष्टीने या प्रकरणी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडूनही होत असून पुढील काही दिवसांत महानगरपालिकेची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष अक्षय चव्हाण, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# गांधी चौक ठाण्यासमोरील बेवारस वाहने हलविणार केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या समोर मागच्या अनेक वर्षांपासून बेवारस वाहने पडून आहेत. त्यामुळे नाहक रस्ता अडवला जात असून ही बेवारस वाहने जर पोलीस प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून या ठिकाणाहून हलवली तर या जागेचा उपयोग मनपा प्रशासन एखाद्या चांगल्या उद्देशासाठी करू शकते,अशा प्रतिक्रिया सुजाण लातूरकरांतून व्यक्त होताना दिसत आहेत.

लातूर शहरातील गांधी चौक हा अतिशय वर्दळीचा चौक आहे. नांदेड रोडवरून आलेल्या प्रत्येक एसटी बसला शहरातील मुख्य बस स्थानकात जाण्यासाठी महात्मा गांधींच्या अर्धाकृती पुतळ्याला वळसा घालूनच जावे लागते. कामाचा दिवस असो की सुटीचा नेहमी हा परिसर वाहनांच्या वर्दळीत असतो. शहरात एखादा मोर्चा अथवा आंदोलन असल्यास मुख्य रस्ता अनेकदा वाहतुकीसाठी बंद करून या मार्गावरून जाणारी वाहतूक गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पुढून, मुख्य पोस्ट कार्यालयाच्या बाजूने वळवली जाते.





त्यावेळी गांधी चौकाकडून मुख्य पोस्ट कार्यालयाकडे जाणारा रस्ताही अतिशय जाम होतो.

लातूर शहरातील वाहतूक आणि वाहनांची संख्या मागच्या काही वर्षात झपाट्याने वाढली आहे. लातूरचे मूळ नागरिक त्यासोबतच शिक्षण-नोकरीच्या निमित्ताने लातुरात वास्तव्यास असणारी मंडळी यांच्यामुळेही वाहनांची संख्या लक्षणीय वाढली आहे. वाहने वाढली असली तरी रस्ते मात्र आहेत तसेच आहेत. त्यामुळेही अनेकदा शहरातील मुख्य रस्ते जाम होताना पाहायला मिळतात.

गांधी चौक पोलीस ठाण्याच्या समोरील मोकळ्या जागेत अनेक दिवसांपासून दोन ट्रक, एक मोडकळीला आलेला ऑटो, जुन्या झाडाचे मोठे खोड पडून आहेत. पोलीस ठाण्यासमोर उभे असलेले ट्रक तर वर्षानुवर्षे पडून आहेत. एखाद्या अपघातात किंवा अन्य काही कारणांमुळे ही वाहने पोलिसांनी जप्त केलेली असू शकतात. मात्र, त्यांची ठराविक कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. विल्हेवाट लावणे जर काही कारणवश शक्य नसेल तर ती रस्त्यावरून हटवून पोलीस प्रशासनाने अन्य ठिकाणी स्थलांतरित करणे गरजेचे आहे. ही नुकसानग्रस्त वाहने ऐन पोलीस ठाण्याच्या समोरच पडून असल्याने एक तर पोलीस ठाण्याला ते शोभेसे दिसत नाही.

तसेच या उभ्या असणाऱ्या वाहनाच्या आडोशाला अगदी दिवसा उजेडी, रस्त्यावर कमालीची वर्दळ असतानाही लघुशंका करणाऱ्यांची संख्याही कमी नाही. अनधिकृत मुतारीसारखा या जागेचा वापर होतोय, ही बाब पोलीस ठाण्यातील प्रत्येक पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही माहिती आहे. पण, तरीही ही वाहने अद्यापपर्यंत हटवण्याची कार्यवाही झालेली दिसत नाही. किमान आत तरी फारसा वेळ वाया न घालवता ही वाहने पोलीस ठाण्याच्या समोरून हटवावीत आणि त्या जागेवर पोस्टाच्या समोर ज्याप्रमाणे बाकडे टाकून नागरिकांच्या बसण्याची व्यवस्था केली आहे, तशा प्रकारचा सामाजिक उपक्रम राबविण्यात यावा, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# रक्तदान हेच महादान : डॉ. शिंदे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर येथील मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटलचे प्रमुख डॉ. महेश शिंदे यांचा ३८ वा वाढदिवस रक्तदान व अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला. मोरया क्रिटीकेअर हॉस्पिटल व संजीवनी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आलेल्या डॉ. शिंदे यांच्या जन्मदिनानिमीत ३० जणांनी रक्तदान केले. त्याचबरोबर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे गरजू पेशंटना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. शिंदे म्हणाले की, गरजू लोकापर्यत डॉक्टरचे जाणे गरजेचे असून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत. भावी काळात गरजू व्यक्तींना व्यक्तीगत पातळीवर जी मदत लागेल ती मी उपलब्ध करून देणार आहे, असे प्रतिपादन केले.




# लातूर शहरातील मोठ्या नाल्या बनल्या आहेत कचऱ्याचे आगार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरातील सर्वच भागात सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित व्हावा, परिसर स्वच्छ राहावा याकरिता मोठमोठ्या नाल्या उभारण्यात आल्या आहेत. नाल्या उभारल्या गेल्या, मात्र त्याची साफसफाई आजपर्यंत कधीच केली गेली नाही. त्यामुळे या नाल्या कचऱ्यांनी भरून गेल्याचे ठिकठिकाणी पाहावयास मिळते. हे



सर्व पाहता या नाल्या कचऱ्याचे आगार बनल्याचे निदर्शनास येत आहे. याकडे मनपा प्रशासनाने त्वरित लक्ष घालण्याची मागणी नागरीकांतून वाढीस लागली आहे.

लातूर शहर हे मराठवाड्यातील वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणून ओळखले जाते. शैक्षणिक पंढरी म्हणूनही लातूरची ओळख आहे. लातुरात आपली मुले शिक्षणासाठी ठेवण्यासाठी पालकमंडळी आसुसलेली असतात. आपला पाल्य लातुरात शिकतोय हे सांगताना पालकांनाही अभिमान वाटतो. या बाबी जरी खऱ्या असल्या तरी स्थानिक मनपा प्रशासनाकडून स्वच्छतेच्या अनेक बाबींकडे हेतुतः दुर्लक्ष्य होत असल्याचे पाहावयास मिळते. वेगाने विस्तारित जाणाऱ्या लातूर शहराच्या जवळपास सर्वच भागात मोठमोठ्या नाल्या बांधण्यात आलेल्या आहेत. मात्र, कोणत्याही भागातील नाल्यांची नियमित सफाई मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून केली जात नाही. हा कोणावर आरोप नसून वास्तव आहे.

मनपाकडे स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यरत असतानाही ते स्वच्छतेचे काम नियमितपणे का करत नाहीत? हाही खरा प्रश्न आहे. शहराच्या विकासासाठी आलेल्या निधीतून मोठ्या नाल्या बांधण्यात आल्या. या नाल्या एकदा का बांधून पूर्ण झाल्या की, संबंधित कंत्राटदारांची जबाबदारी संपली. त्यानंतर मुख्य जबाबदारी येते ती मनपाच्या स्वच्छता विभागाच्या प्रमुखांवर. स्वच्छता प्रमुखांनी त्या त्या विभागाच्या स्वच्छता निरीक्षकांच्या माध्यमातून नियमितपणे स्वच्छतेची कामे केली जातात का? याचा आढावा घेणे आवश्यक असते. प्रत्यक्षात मनपाच्या स्वच्छता विभागात सगळाच सावळा गोंधळ असल्याचे दिसून येते. याठिकाणी एकाचा पायपोस एकाला नसल्याचे दृष्टीपथास येते. हे तर काहीच नाही, मनपात कायमस्वरूपी स्वच्छता कर्मचारी म्हणून सेवेत असलेली बरीच मंडळी स्वतः कामावर न येता आपल्या जागी रोजंदारीवरील कामगाराला पाठवत असल्याचा धक्कादायक प्रकारही मनपात उघडकीस आल्याचे सर्वज्ञात आहे. त्यामुळे मनपाचा सगळा कारभारच रामभरोसे चालतोय की काय? अशी शंका कोणाही सुजाण नागरिकांच्या मनात निर्माण झाल्यास त्यात वावगे ते काय?

लातूर शहरातील कोणत्याही भागातील मोठ्या नाल्यातील कचरा काढून त्या कधीही स्वच्छ केल्याजात नाहीत. कचऱ्याने नाल्या भरून पावसाळ्यात रस्त्यावर इतस्ततः नळीतील घाण पाणी पसरल्याचे चित्र जवळपास अनेक भागात पाहायला मिळाले. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास शहराच्या जुना औसा रोड, सिंचन भवन परिसरात पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने नाल्याची घाण पूर्णपणे रस्त्यावर येऊन साचल्याने नागरिकांना अनेकदा घाणीच्या विळख्यात वावरण्याची पाळी आली. याबाबत सामान्यांनी दाद मागायची तरी कोणाकडे? कारण मनपाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडे तक्रार केली तरी तो काहीतरी सांगून वेळ मारून नेतो, असा अनेकांचा अनुभव आहे.

मनपात मागाचयातीं साडेतीन वर्षापासून पदाधिकारीच नसल्याने सगळा कारभार प्रशासकाच्या माध्यमातून चालू आहे. आता आगमिकही महिन्यात मनपाच्या निवडणुका झाल्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळातच काही चांगले होऊ शकेल, अशा विचाराने लोक दिवस कंठत आहेत. मात्र, काहीही झाले तरी शहरातील मोठ्या नाल्या कचऱ्याचे आगार बनल्यागत झाल्याचे पाहावयास मिळते, हे वास्तव आहे.

# लातुरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला

## महापालिका प्रशासनाकडून प्रतिबंधाची नागरिकांची मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहराच्या जवळपास सगळ्याच भागात मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. या मोकाट कुत्र्यांमुळे लहान बालकांना आपल्या घरासमोर मुक्तपणे खेळणे-बागडणेही दुरापास्त झाले आहे. महिला-नागरिकांनाही या मोकाट कुत्र्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लातूर शहर मनपा प्रशासनाने अशा मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूर शहराचा असा एकही परिसर नाही, ज्या भागात मोकाट कुत्र्यांचा वावर नाही. शहराच्या कोणत्याही कॉलनी-नगरात जा, त्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा समूह आढळून येतो. अनेकदा ही मोकाट कुत्री दिवसाच्या वेळेत



नागरिकांना फारसा त्रास देत नाहीत. मात्र, रात्र झाली की, त्यांच्या हिंस्रपणाला सुरुवात होते. रात्रीच्या वेळेस वर्षानुवर्षे एकाच गल्ली, कॉलनी-नगरात राहणाऱ्या लोकांनाही ही मोकाट कुत्री भुंकून परेशान करतात. अनेकांना रात्री उशिरा आपल्याच घरी जायचे म्हणजे छातीत धस्स होते. ही मोकाट कुत्री भुंकून तर त्रास देतातच, त्याशिवाय चक्क लोकांच्या अंगावर चवताळून धावून जाऊन त्यांचा चावा घेण्यासाठी पुढे सरसावतात. पायी चालणाऱ्या लोकांनाच नाही तर दुचाकीवरून जाणाऱ्या वाहनधारकांच्याही मागे धावून ही कुत्री चांगलीच परेशान करताना आढळून येतात. कुत्र्यांमुळे आपल्या घर-परिवाराचे संरक्षण होत असले तरी त्याचा त्रासही अनेकांना होत असल्याचे पाहावयास मिळते.

लातूर शहरातील एलआयसी कॉलनी, बलदवा नगर, ओमसाई नगर, रुद्रेश्र्वर नगर, प्रगती नगर, इंद्रायणी कॉलनीसह अनेक भागात मोकाट कुत्र्यांचा वावर मागच्या काही दिवसात कमालीचा वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक मनपा प्रशासनाने अशा मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणीही वाढीस लागली आहे. मोकाट कुत्र्यांच्या दंशामुळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्राणघातक ठरू पाहणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा प्रतिबंध वेळीच करण्यात यावा, अन्यथा नागरिकांना त्याकरिता रस्त्यावर उतरावे लागेल,असा इशाराही देण्यात येत आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्यांना बियाणे वाटप

**लातूर जिल्हा भारतीय किसान संघाचा उपक्रम**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** भारतीय किसान संघाच्या लातूर जिल्हा यांच्या वतीने पूरग्रस्त अल्पभूधारक शेतकऱ्यांना रबी पिकासाठी बियाणे वाटप करण्यात आले.

यावेळी भारतीय किसान संघ लातूर जिल्हा अध्यक्ष महादेवआप्पा गिरवलकर, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर हुरदळे, जिल्हा




कोषाध्यक्ष सतीशराव देशपांडे, लातूर जिल्हा मंत्री नवनाथ मद्दे, जिल्हा सदस्य अशोक मठपती, उद्योजक चंद्रशेखर हुंडेकरी स्वामी, शेखर मराठे, जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ उटेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

लातूर जिल्ह्यातील एकूण सहा तालुक्यात मिळून ३५ गावातील १०२ शेतकऱ्यांना गहू आणि हरभरा या बियाणांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष गिरवलकर यांनी शेतकऱ्यांच्या सहकार्यासाठी भारतीय किसान संघ सदैव तत्पर असल्याचे सांगितले. जिल्हामंत्री नवनाथ मद्दे यांनी मनोगत व्यक्त करताना अतिवृष्टीने नुकसान झालेल्या अल्पभूधारक शेतकरी बांधवांसाठी हा मदतीचा छोटासा प्रयत्न असल्याचे सांगितले. बळीराजाला भारतीय किसान संघ मदत करण्यासाठी नेहमी सज्ज राहील, असा विश्वासही मद्दे यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांनी अतिशय आनंदाने भारतीय किसान संघाला शुभ आशीर्वाद दिले.

अडचणीत केलेली मदत आम्ही कधीही विसरू शकणार नाही भारतीय किसान संघ आमच्या पाठीशी सदैव राहो, अशी सर्व शेतकऱ्यांनी प्रार्थना केली.

# ज्येष्ठ नागरिकांचे पालनपोषण, कल्याण कायद्याविषयी मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** केंद्र सरकारचा समाज कल्याण व सक्षमीकरण विभाग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ या विषयी जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या जनजागृती शिबिरामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश देवधर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संघटक डॉ. बी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, मंडळ अधिकारी आर. के. झाडे, जिल्हा विधी सेवा



प्राधिकरण लातूर चे कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

‘वसुधैव कुटुंबकम’चा संदेश देणाऱ्या आपल्या देशात वृद्धाश्रमांची स्थापना होणे, ही खेदाची बाब आहे. घरातील आजी-आजोबा हे घराचा वारसा असतात. त्यामुळे घराण्याचा वारसा जपणे, घरातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरीकांची यादी पोलीस अधिक्षक कार्यालयात असणे गरजेचे आहे. तसेच ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारीचे निरासरण होण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयात हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात आला असून ज्येष्ठ नागरिकांनी यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक मनुष्य हा वयाची साठी ओलांडलेवर ज्येष्ठ नागरीक बनत असतो. त्यामुळे त्याची जाणीव ठेवून घरातील सर्व ज्येष्ठ नागरीकांची काळजी व हीत जपणे सर्वांची जबाबदारी आहे, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी सांगितले. तसेच पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ व महाराष्ट्र पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण नियम २०१० मधील तरतुदींबाबत सविस्तर माहिती दिली.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा कृष्णा राठोड करिअर कट्टा राज्यस्तरीय रील स्पर्धेत प्रथम



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१९ नोव्हेंबर

येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी तथा करिअर संसद मुख्यमंत्री कृष्णा विनोद राठोड हा विद्यार्थी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा राज्यस्तरीय रील स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून प्रथम आला आहे. या स्पर्धेत राज्यभरातून एकूण १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.कृष्णा राठोड याने करिअर कट्टा उपक्रमाचे विद्यार्थी जिवनातील महत्त्व स्पष्ट करणारी रील बनवली आहे. ही रील जिल्ह्यात प्रथम ठरली आहे.

कृष्णाच्या यशा बद्दल संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे, सचिव प्रकाश काळे,प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकृष्ण परिहार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी,करिअर संसद पदाधिकारी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.रील बनवण्यासाठी कृष्णा राठोड यास महाविद्यालयीन समन्वयक डॉ.मनोजकुमार चोपडे व डॉ.संतोष पडघन याचे मार्गदर्शन लाभले.

## दशसूत्रीच्या अंमलबजावणीसाठी २५ रोजी सर्व शाळांमध्ये पालक मेळावे

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ - दशसूत्री या विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, आरोग्यक्षम, स्पर्धाक्षम करण्याच्या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंगळवार दि.२५ रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये एकाच दिवशी पालकांचे मेळावे घेण्यात यावे, असे निर्दे श जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. दि.२५ रोजी सकाळी साडे नऊ ते अकरा या वेळत या मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे व पालकांना उपक्रमाची माहिती देण्यात यावी. उत्तम विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांप्रमाणे पालकांचा सहयोग असणेही आवश्यक आहे. त्यादृष्टिने पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी या मेळाव्यांचे आयोजन करावे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी म्हटले आहे.

## सिम्बॉयसिस लॉ ॲडमिशन टेस्ट २०२६ अर्जाची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपणार

मुंबई - सिम्बॉयसिस लॉ ॲडमिशन टेस्ट २०२६ च्या अर्जांची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपत आहे. कायदे क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना त्यांचे अर्ज पूर्ण भरून प्रीमिअर कायदे शिक्षणाच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्याचे आवाहन करण्यात येत आहे. परीक्षा २० डिसेंबर २०२५ (शनिवार) आणि २८ डिसेंबर २०२५ (रविवार) रोजी घेतल्या जाणार आहेत. सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) तर्फे घेतली जाणारी सिम्बॉयसिस लॉ ॲडमिशन टेस्ट म्हणजे पुणे, नोएडा, हैदराबाद आणि नागपूर येथील सिम्बॉयसिस लॉ स्कूल्समधील प्रीमिअर अंडरग्रॅज्युएट लॉ अभ्यासक्रमासाठीचे प्रवेशद्वार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिम्बॉयसिस लॉ ॲडमिशन टेस्ट मध्ये उमेदवारांना दोनदा परीक्षा देता येते. यातील सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातात.

## ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर फॅशनला घेऊन गेला फ्युचरव्हर्समध्ये

छत्रपती संभाजीनगर- ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने त्यांच्या गुरुग्राम आवृत्तीत 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन' ची सुरुवात केली, ज्यामध्ये तंत्रज्ञान, डिझाइन आणि आकर्षक कथाकथन फॅशनच्या अनुभवाची पुनर्कल्पना कशी करत आहे याचा एक अभूतपूर्व शोध घेण्यात आला. फॅशनच्या पुढील वाटचालीची व्याख्या करण्याच्या या वर्षीच्या ध्येयापासून पुढे जात, या आवृत्तीने एक अविश्वसनीयपणे आकर्षक असे दृश्य सादर केले ज्यामुळे फॅब्रिक आणि त्याचे स्वरूप याच्या पलीकडे, -ख, कोड आणि परस्परसंवादाच्या डिजिटल युगाची झलक दिसली.

## बस बुकिंगमध्ये रेडबसने नोंदवली ७८ टक्के वाढ

मुंबई : शुभ मुहुर्तांचा आणि सणासुदीचा काळ सध्या सुरू आहे आणि या काळात महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांनी प्रवासाच्या मागणीत दमदार वाढ नोंदवली आहे. या काळात बस बुकिंग ७८ टक्क्यांनी वाढली आहे. १५ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर २०२५ या काळाची मागील वर्षीच्या याच कालावधीशी तुलनना करणाऱ्या रेडबस व्यासपीठावरील आकडेवारीनुसार मुहुर्तांच्या काळात शुभ प्रसंगांसाठी प्रवास करण्यात लक्षणीय वाढ झाली आहे.

## बंधन बँकेकडून 10 रुग्णवाहिकांची मदत

अहमदनगर : बंधन बँकेने आपल्या सीएसआर उपक्रमांचा भाग म्हणून, अहमदनगरसह संपूर्ण देशात पूर्णपणे सुसज्ज १० रुग्णवाहिकांची मदत केली आहे. यामुळे आपत्कालीन वैद्यकीय सुविधा बळकट करणे आणि आरोग्यसेवा वितरण सुधारणे शक्य झाले आहे. बँकेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात अशा सामाजिक उपक्रमाची घोषणा करण्यात आली होती. रुग्णवाहिकांची मदत करत त्यांनी हा उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. आरोग्यसेवेचा विस्तार आणि प्रतिसाद सुधारण्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळावी यासाठी बँकेची वचनबद्धता या उपक्रमातून दिसून येते. बंधन बँकेचे प्रादेशिक नेतृत्व आणि स्नेहालयाच्या विश्वस्तांच्या सन्माननीय उपस्थितीत ही रुग्णवाहिका औपचारिकपणे स्नेहालय अहमदनगरला सुपूर्द करण्यात आली.

# यश-अपयशापेक्षा स्पर्धेतील अनुभव जीवनासाठी महत्त्वाचा : दिलीप स्वामी

### स. भु. करंडक विभागीय वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद, गंगाखेडचा कविश बेद्रे ठरला स. भु. सुवर्ण करंडकाचा मानकरी





छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेणे महत्त्वाचे असते. कारण यश किंवा अपयश यापेक्षाही स्पर्धेतला अनुभव जीवनासाठी महत्त्वाचा असतो असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले. भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवानिमित्त स.भु. कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या स.भु. करंडक मराठवाडा विभागीय वक्तृत्व स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धेत गंगाखेड येथील सरस्वती विद्यालयाचा कवीश रामेश्वर बेद्रे स. भु. सुवर्ण करंडकाचा मानकरी ठरला.

गोविंदभाई श्रॉफ सभागृहात स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण सोहळा पार पडला. यावेळी विचारपीठावर प्रमुख पाहुणे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, स.भु. चे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, सहचिटणीस डॉ. सुनील देशपांडे, न्या. पुखराज बोरा व प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांची उपस्थिती होती.

स.भु शिक्षण संस्थेतर्फे या वर्षी 'संविधान जागर अभियान' राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत ९ वी ते १२ वी गटासाठी आयोजित वक्तृत्व स्पर्धेत मराठवाडयाच्या विविध जिल्ह्यांतून तब्बल २९० स्पर्धकांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आजकाल समाजात केवळ हक्कांचाच विचार केला जातो. मात्र कर्तव्यांचा विसर पडत चालला आहे, हे अतिशय चिंताजनक आहे. अशा आव्हानात्मक स्थितीत स.भु. शिक्षण संस्था समाजात देशप्रेम आणि कर्तव्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहे. स्पर्धेसाठी ठेवलेले विषय चिंतनीय होते असेही ते म्हणाले. या कौतुकास्पद उपक्रमासाठी संस्थेचे अभिनंदनही करतो आणि आभारही मानतो. स्पर्धेचे उद्घाटन स.भु. चे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील यांनी केले.

कविश रामेश्वर बेद्रेने पटकावला स. भु. सवर्ण करंडक

या स्पर्धेत सर्वच स्पर्धक अत्यंत तयारीनिशी आल्याचे जाणवले. या स्पर्धेत गंगाखेड येथील सरस्वती विद्यालयाचा कवीश रामेश्वर बेद्रे याने प्रथम क्रमांक पटकावला आणि ११,००० रुपये रोख, प्रमाणपत्र व स.भु. सुवर्ण करंडकावर नाव कोरले. द्वितीय क्रमांक छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालय लिज्जो राजेश नायर हिने पटकावून ७,००० रुपये रोख, प्रमाणपत्र व स.भु. रौप्य करंडक, तर स.भु. विज्ञान महाविद्यालयाच्या अन्वी जांबोटकर हिने तृतीय क्रमांक, पटकावून ५००० रुपये रोख, प्रमाणपत्र व स.भु. ताम्र करंडक पटकावला. उत्तेजनार्थ २००० रुपये रोख, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह असे पारितोषिक वरद निशीकांत कुलकर्णी, स.भु. प्रशाला, छत्रपती संभाजीनगर, झोया परवेज शेख, रफिक झकेरिया महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह), ओम सचिन कोक्कर, स.भु कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह), सिध्दी बाळासाहेब मते, श्री शारदा मंदिर कन्या प्रशाला, छत्रपती संभाजीनगर (प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह), नम्रता गोरख मोरे, होलीफेथ इंग्लिश स्कूल, भराडी (प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह) या स्पर्धकांनी पटकावले. परीक्षक म्हणून न्या. पुखराज बोरा, सुभाष भाले, डॉ. सानिया शिऊरकर, डॉ. मेघना गोरे, जिया सिद्दीकी, रणजित खंदारे, कानबा घोंगडे व दीपाली कळवणकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक स.भु. चे सहचिटणीस डॉ. सुनील देशपांडे यांनी केले. प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी स्पर्धेचा आढावा घेतला. स्पर्धा समन्वयक डॉ. बालाजी नागटिळक यांनी उपस्थितांचे आभार मानले. तर स्पर्धा सहसमन्वयक डॉ. केशव अंधारे यांनी निकालाचे वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. नागेश अंकुश यांनी केले.

# 'देवमुद्रा'च्या वतीने शहरात दोनदिवसीय शास्त्रीय नृत्य-धृपद संगीत महोत्सव

### शनिवार-रविवार नृत्य-संगीताची मेजवानी

छत्रपती संभाजीनगर - देवमुद्रा अ मूव्हमेंट स्कूल - सांस्कृतिक ट्रस्ट, छ.संभाजी नगर आणि धृवपद गुरुकुलम ट्रस्ट, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात शनिवार आणि रविवार (२२ आणि २३ नोव्हे.) दोन दिवसीय संस्कृती - शास्त्रीय नृत्य आणि धृपद संगीत महोत्सव आयोजित करण्यात आले आहे. संस्कृती - शास्त्रीय नृत्य महोत्सवाचे हे १२ वे वर्ष तर संगीत महोत्सवाचे पहिलेच वर्ष आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रख्यात शास्त्रीय नृत्य आणि धृपद गायन कलाकार सादरीकरण करणार आहेत. महोत्सवासोबतच



विद्यार्थ्यांसाठी 'सौभाग्य प्रतिभा' ही शास्त्रीय नृत्य स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. तापडिया नाट्य मंदिर, निराला बाजार येथे होणारा हा महोत्सव सर्व कलारसिकांसाठी मोफत आहे.

यंदाच्या महोत्सवामध्ये २२ नोव्हेंबरला डॉ राज्यलक्ष्मी सेठ (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली देवमुद्रा ग्रुपचे विद्यार्थी ललिता देवी चरितं - कुचिपूडी या नृत्य प्रकारातील नृत्य नाटिका सादर करणार आहेत. त्याच बरोबर हैद्राबादचे प्रसिद्ध नृत्य कलाकार डॉ.कलाकृष्ण यांचे विद्यार्थी आंध्र नाट्यम आणि पेरीनी तांडवम सादर करणार आहेत. त्यानंतर डॉ. कलाकृष्ण यांनी आंध्र नाट्यम आणि शास्त्रीय नृत्यात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना कृष्ण प्रतिभा २०२५ या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्काराचेही हे पहिलेच वर्ष आहे.

२३ नोव्हेंबर रोजी भोपाळ येथील प्रसिद्ध 'धृपद बंधू' श्री. संजीव व श्री. मनीष यांचे धृपद गायन सादर होणार आहे. त्यांना छ.संभाजीनगरचे पखवाज वादक श्री गणेश भुतेकर यांची साथ लाभणार आहे. त्या नंतर डॉ राज्यलक्ष्मी सेठ (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली कुचिपूडी नृत्य प्रकारातील.

'श्री नारायण वर्णमाला' ही नृत्यनाटिका सादर करणार आहेत. त्यानंतर 'सौभाग्य प्रतिभा' या शास्त्रीय नृत्य स्पर्धे चे बक्षीस वितरण होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगरच्या पोलिस उपायुक्त सौ. शर्मिष्ठा घार्गे वालावलकर आणि उद्योजिका व नृत्यप्रेमी सौ मोहिनी केळकर या लाभल्या आहेत.

हा उत्सव सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. सर्व कला रसिकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन देवमुद्रा च्या संचालिका डॉ. व्ही. सौम्याश्री यांनी केले आहे.

## एमजीएममध्ये 'महापूर : कारणे आणि उपाय' विषयावर चर्चासत्राचे आयोजन

### ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्म्युनिकेशन,कल्चर अँड मिडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'महापूर : कारणे आणि उपाय - अभ्यास अहवालाचे प्रकाशन व चर्चा सत्राचे आयोजन गुरूवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता विनोबा भावे सभागृह येथे करण्यात आले आहे.

मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्राला यावर्षी महापुराच्या संकटाने जबर फटका बसला. अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कटले असून पुनर्वसनासाठी शासकीय आणि सामाजिक पातळीवर व्यापक प्रयत्नांची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर महापुराची नैसर्गिक व मानवनिर्मित कारणे, त्याचे परिणाम आणि भविष्यातील उपाययोजना यावर आधारित तज्ज्ञ अभ्यास अहवालाचे प्रकाशन आयोजित करण्यात आले आहे.

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (छ-झच्) यांच्या वतीने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या या अहवालामध्ये प्रदीप पुरंदरे, अतुल देऊळगावकर, नीरज हातेकर, सारंग यादवाडकर, सोमीनाथ घोळवे, संपत काळे, अनिकेत लोहिया या तज्ञ मंडळींचा सहभाग आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी श्रीराम जाधव ७५८८७५१६१५ यांच्याशी संपर्क साधता येणार आहे. या कार्यक्रमास सर्वांना खुला प्रवेश असून मोठ्या संख्येने नागरिकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जैन समाजाची एकता व गुरु भक्ती प्रशनीय : आचार्य श्री प्रसन्नसागरजी

### अंतर्मना आचार्य श्री.प्रसन्नसागरजी महाराज यांना समीक्षा अजमेरा हिने बनवलेले हस्त रेखाचित्र भेट

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - पुष्पगिरी तीर्थ प्रणेता गणाचार्य पुष्पदंतसागरजी महाराज यांच्या उपवनातील सुगंधीत पुष्प साधना महोददी अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांचा २०२५ चा चातुर्मास तरैणसागरम तीर्थ मुरादनगर, गाजीयाबाद उत्तरप्रदेश येथे अंतीम टप्यात असुन त्यांच्या सानिध्यात पुर्ण चार महिने विविध धार्मिक कार्यकम या ठिकाणी संपन्न झाले. याच श्रृंखलेत छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचे परम गुरैभक्त नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी तेथे जाउन त्यांचे सपन्तीक दर्शन घेवुन आर्शिवाद प्राप्त केले. यावेळी नरेंद अजमेरा यांची



कन्या समिक्षा अजमेरा हिने आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांचे हुबेहुब हाताने तयार केलेले चित्र त्यांना भेट दिले. चित्र पाहुन प्रसन्नसागरजी महाराज यांचा आनंद व्दिगुणीत झाला. कारण हे चित्र हुबेहुब बनिण्यात आले होते. यावेळी आचार्यश्रींनी या चित्रावर आपले हस्ताक्षर व शुभआर्शिवाद देउैन हे चित्र परत समिक्षा अजमेरा हिला भेट म्हणुन दिले.

यावेळी उपस्थित भाविकांना आपल्या आर्शिवचनात छत्रपती संभाजीनगर ची ख्याती व जैन समाजाची एकता व गुरै व संतांच्या प्रती असलेली आस्था कशी असते तर हे छत्रपती संभाजीनगर वासीयांकडुन शिकावे. त्यांनी सांगीतले की माझा २०१० चा ऐतिहासिक चातुर्मास छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला असुन कमीत कमी दोन तीन वेळेस छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्य करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले आहे असेही त्यांनी शेवटी सांगीतले. यावेळी नरेंद्र अजमेरा, नयना अजमेरा, पियुष कासलीवाल, किर्ती कासलीवाल, समिक्षा अजमेरा, मौलीक कासलीवाल, सत्यम जैन, मनिष जैन, सुरेंद्र जैन, अजय सेठी, रमेश कासलीवाल, त्रिलोक जैन आदींची यावेळी उपस्थिती होती.

## गुणेश्वर महादेव मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने रामायण कथा व विविध नामवंत किर्तनकारांचे किर्तनाचे आयोजन

### भाविक भक्तांनी लाभ घ्यावा : गुणाजी महाराज गाडेकर



खुलताबाद प्रतिनिधी : गुणेश्वर महादेव मंदिर प्रतिष्ठान ११ वर्ष वर्धापन दिनानिमित्त राम कथा व ज्ञानेश्वरी यज्ञ दु १२ते ३ या वेळेत असून संध्याकाळी. महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांचे, किर्तनाचे आयोजन दि १९ नोव्हेंबर , पासून कार्यक्रमाची सुरुवात विविध मान्यवरांच्या उपस्थित होणार असून चंपाषष्ठी ज्या दिवशी कार्यक्रमाची सांगता. दि २६ नोव्हेंबर रोजी होणार असून या सोहळ्यासाठी महाराष्ट्रभरातील भाविक भक्त नी, या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन

कार्यक्रमाचे आयोजन शिवभक्त गुणाजी महाराज गाडेकर (बाबा) मारसावळी तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजी नगर.

# सोयगाव येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना; अध्यक्षपदी तुकाराम तायडेंची निवड

### माजी विद्यार्थी बाळु बोरसे यांनी प्रशालेच्या विद्यार्थी गुणवता विकास उपक्रमासाठी साठी रोख ११११ रु ची त्वरित आर्थिक मदत

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ नोव्हेंबर

जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह बैठक मेळावा घेऊन जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे माजी विद्यार्थ्यांची संघ स्थापन करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रशालेचे विविध क्षेत्रात सामाजिक,राजकीय,शैक्षणिक,व्यावसायिक,उद्योग,शेती, सहकार,तंत्रशिक्षण,उच्च शिक्षण,वैद्यकीय,संशोधन, प्रशासन,कला इत्यादी अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रशालेच्या माजी विद्यार्थी संघ कार्यकारणी समिती निवडण्यात आली तालुक्यातील प्रसिद्ध यशस्वी व्यावसायिक तुकाराम तायडे यांची अध्यक्ष तर माजी गटशिक्षणाधिकारी गिरीश जगताप कार्याध्यक्ष

प्राध्यापक निलेश गाडेकर,कोषाध्यक्ष

युवानेतृत्व हर्षल काळे,सहकार्याध्यक्ष,उपाध्यक्ष यांच्या सह सर्व सदस्य रवींद्र काळे,संजय शहापूरकर,दिलीप रावणे, महेश फुसे,गजानन ढगे,कृष्णा जुनघरे,निलेश मिसाळ, मोहन इंगळे,मंगलाताई बोरसे,दौलतसिंग परदेशी,सदस्य सचिव



मुख्याध्यापक दादाराव राठोड,याप्रमाणे माजी विद्यार्थी संघ कार्यकारी समिती एक मताने चर्चे तून निवडण्यात आली.सदरील स्नेह मेळावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी समाजसेवक संजय शहापूरकर हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी सचिन पाटील,सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी,माजी गटशिक्षणाधिकारी पाचोरा व प्रशालेचे माजी विद्यार्थी व शिक्षक मुख्याध्यापक गिरीश जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली.यावेळी मुख्याध्यापक यांच्यावतीने प्रशालेचे माध्यमिक शिक्षक दौलतसिंग परदेशी यांनी शासनाचा माजी विद्यार्थी संघ स्थापनेबाबत मार्गदर्शक असा शासन निर्णय वाचून दाखवून माजी विद्यार्थी संघाचे कार्य व जबाबदारी कर्तव्य,आवश्यकता याबाबत प्रास्ताविकात मार्गदर्शन केले.यानंतर उपस्थितांमधून वरील कार्यकारणी ची निवड करण्यात आली तर सर्व माजी विद्यार्थी हे संघाचे सदस्य असतील असे जाहीर करण्यात आले.यावेळी प्रशालेचे माजी विद्यार्थी निलेश गाडेकर यांनी प्रशालेतील विविध उपक्रमात खास करून क्रीडा क्षेत्रात प्रशालेच्या विद्यार्थ्यांना विना मोबदला व कुठलीही क्रीडा क्षेत्रातील स्पर्धेबाबत मार्गदर्शन करण्याचे मान्य केले . यावेळी गिरीश जगताप यांनी सखोल मार्गदर्शन करून प्रशालेच्या भौतिक गरजा साठी प्रशालेच्या अनेक माजी विद्यार्थी यांच्याशी संपर्क साधून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सदरील कार्यकारी समिती ने कार्य करावे व आपल्या प्रशालेचा गुणवत्ता पूर्ण विकास साधावा असे आवाहन केले सचिन पाटील व फिरोज तडवी यांची समायोचीत मार्गदर्शन पण मनोगत व्यक्त केले प्रशालेचे माजी विद्यार्थी व प्राध्यापक अनिल मानकर यांनी प्रशालेच्या ज्या काही भौतिक गरजा असतील याची विकासात्मक सखोल आराखडा करून सदरील समिती व शाळा व्यवस्थापन समिती व प्रशासन यांनी शाळा विकास आराखड्यानुसार प्रशालेची उन्नती घडवण्यासाठी कार्य करावे असे मत व्यक्त करून प्रशासलेला कोणतीही गरज असेल तेव्हा आवाहन कराल तेव्हा मदत देण्याचे कबूल केले.नूतन अध्यक्ष तुकाराम तायडे व सर्व कार्यकारिणी सदस्यांनी प्रशालेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी प्रशालेच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना संपर्क करून प्रशालेचा गुणवत्तापूर्ण विकासासाठी प्रयत्न करण्यात येतील असे निवेदन केले.

यावेळी प्रशालेच्या विकासासाठी वेळोवेळी माजी विद्यार्थी म्हणून भरीव मदत करण्याचे सर्वच उपस्थित माजी विद्यार्थी यांनी मान्य केले.माजी विद्यार्थी बाळु बोरसे यांनी प्रशालेच्या विद्यार्थी गुणवता विकास उपक्रमासाठी साठी रोख ११११ रु ची त्वरित आर्थिक मदत केली.तर दौलत परदेशी यांनी ५००० रुपये मदत केली आहे.

वरील कार्यकारणीसह यावेळी प्रशालेचे माजी विद्यार्थी समाजसेवक राजू दुतोंडे,नगरसेवक संतोष बोडखे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामेश्वर शिरसाट,प्राध्यापक डॉ. योगेश पुरी,शिक्षक पंकज रगडे,गोपाल चौधरी,विशाल चौधरी,योगेश फुसे,सुपडू सोनवणे यांचे सह कृषी भूषण शेतकरी अरुण सोहनी,सचिन चौधरी,ऋषिकेश लवटे,संजय ताडे,दिलीप कळवत्रे,अशोक घनगाव,बाळू बोरसे,समाधान काळे,अनिल मानकर यांचे समाजातील अनेक माजी विद्यार्थी बैठकीस उपस्थित होते.यावेळी प्रशालेचे वतीने अध्यक्ष व नूतन कार्यकारणी समितीचा स्वागतपर सन्मान करण्यात येऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांच्या नेतृत्वात सर्व शिक्षक सुखदेव पाटील,दौलतसिंग परदेशी,शिवाजी नवले,राजेंद्र उंबरकर, विद्याधर बागुल,संतोष भारद्वाज,वैजनाथ सावळे,तुकाराम पायघन,संगीता सोनवणे,जया वाघ,शिवाजी नवले,सचिन ढगे,सिमा राऊत व निर्देशक सचिन ढगे व सीमा राऊत,शिवराम आगे यांनी परिश्रम घेतले.

अग्रलेख...

# शेख हसीना, भारत आणि दक्षिण आशिया

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने मृत्युदंड ठोठावल्याची घटना ही केवळ एका व्यक्तीच्या किंवा देशाच्या भविष्यापुरती नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियाच्या भविष्याशीही संबंधित आहे. अफगाणिस्तानातील तालिबान्यांचे शासन, पाकिस्तानात लष्कराच्या तालावर चालत असलेले सरकार, नेपाळ-श्रीलंकेतील अनागोंदी या पृष्ठभूमीवर लवादाच्या या निर्णयाकडे पाहावे लागते. चीनचा दांडगेपणाही लक्षात घ्यावा लागतो. गेल्या वर्षी जुलै महिन्यात बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांतील आरक्षणावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. हे आंदोलन फार तीव्र झाले तेव्हा शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी उफाळून आली. शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष, सुरक्षा यंत्रणा आणि विद्यार्थी-आंदोलक असे संघर्ष झडले. आंदोलकांवर सुरक्षा यंत्रणांनी कारवाई केली आणि त्यात शेकडो लोक मारले गेले. त्यानंतर परिस्थिती इतकी चिघळली की, शेख हसीना यांना देश सोडून पळून जावे लागले आणि भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरिम सरकार आले. त्या सरकारने लवादाची पुनःस्थापना केली आणि १७ नोव्हेंबरला त्या लवादाने शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. हत्या, हत्येचा प्रयत्न, घातक शस्त्रांच्या वापराची परवानगी इत्यादी प्रकारचे आरोप शेख हसीना यांच्यावर आहेत. त्यांनी अर्थातच हे आरोप फेटाळले आहेत आणि ही शिक्षा अनिवार्चित सरकारच्या पुढाकाराने राजकीय हेतूने ठोठावली गेली असल्याचे म्हटले आहे. मूलतत्त्ववादी विचारसरणीचे प्राबल्य असलेल्या देशांचे काय होते, याचे हे आणखी एक उदाहरण म्हटले पाहिजे. पाकिस्तानसारखा बांगलादेशचाही इतिहास रक्तरंजितच आहे. भारतासोबत स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानची स्थिती आपण पाहतोच आहोत. बांगलादेशची निर्मिती पाकिस्तानच्या विभाजनातून झाली होती, हा इतिहास आहे. परंतु, एकसंघ वा विभाजित पाकिस्तानी प्रदेश हा मुस्लिमबहुल आणि इस्लामी मूलतत्त्ववाद्यांचा प्रभाव असलेला प्रदेश आहे, हे नाकारता येत नाही. शेख हसीना यांचे पिताश्री आणि बांगलादेशचे संस्थापक राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबूर रहमान यांनी बांगलादेशला प्रगतिशील चेहरा देण्याचा प्रयत्न केला. त्या देशाच्या राज्यघटनेत 'सेक्युलर' शब्दाचा समावेश केला. पण, मूलतत्त्ववाद्यांनी त्यांना सतत त्रास दिला. अखेर शेख मुजीबूर रहमान यांची १९७५ साली त्यांच्या कुटुंबीयांसह हत्या झाली. शेख हसीना म्हणजे त्या शेख मुजीबूर रहमान यांच्या कन्या. त्यांच्या विरोधक आहेत बेगम खालिदा झिया. बेगम खालिदा या माजी राष्ट्राध्यक्ष झिया ऊर रहमान यांच्या पत्नी. खालिदा झिया ज्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख आहेत, त्या पक्षाची स्थापना झिया ऊर रहमान यांनी केली होती. हा पक्ष तितकासा प्रगतिशील विचारसरणीचा नाही. उलट तो मूलतत्त्ववाद्यांच्या जवळचा आहे. शेख मुजीबूर रहमान यांची हत्या झाली तशी झिया ऊर रहमान यांचीही हत्या झाली. झिया ऊर रहमान हे लष्करी अधिकारी होते. त्यांचा जीव लष्करानेच घेतला. एकुणात हा इतिहास फार मोठा आहे. या इतिहासाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे आहे की, तो रक्तरंजित आहे, कौटुंबिक वैराचा आहे आणि देशाचे भविष्य पणाला लावण्याचाही आहे. गेली किमान चार दशके बांगलादेश प्रगतिपथावर होता. गारमेंट उद्योगात तर त्याचे जगात नाव झाले होते. जगाच्या कोणत्याही भागात जाऊन रेडिमेड कपडे घेतले तरी ते प्रामुख्याने मेड इन बांगलादेश असायचे, इतका हा व्यवसाय तेजीत होता. इतरही क्षेत्रांत प्रगती होत होती. शिक्षणात चांगले काम होत होते. आरोग्याच्या सोयी वाढत होत्या. गतवर्षी अचानक उफाळलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनामागे असलेल्या शक्तींनी या विकासाला खीळ घातली. काही दोष शेख हसीना यांचाही होताच. पण, त्यातून उद्भवलेल्या संघर्षात बांगलादेशचे फार मोठे नुकसान झाले. प्रगतीच कुंठित झाली. अजूनही बांगलादेशातील लोकांना नेमके काय चालले आहे आणि उपाय म्हणून काय करायचे, हे लक्षात आलेले नाही. नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस हे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार असले तरी त्यांना या संकटातून देशाला कसे तारायचे याचे भान आलेले दिसत नाही. त्यामुळेच त्यांनी शेख हसीना यांना झालेल्या मृत्युदंडाचे उठवळपणे स्वागत करून टाकले. एकप्रकारे त्यांनी खालिदा झिया यांच्या सुरात सूर मिळविला. बांगलादेशात पुढच्या वर्षी फेब्रुवारीत निवडणुका व्हायच्या आहेत. त्या होतात की नाही, हे आताच सांगता येत नाही.

गतवर्षीपासून सारेच अनिश्चित बनले आहे. आता शेख हसीना यांना ठोठावलेल्या शिक्षेमुळे ही अनिश्चितता वाढलेली आहे. आताच्या स्थितीत भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. शेख हसीना यांना बांगलादेशला परत पाठवावे अर्थात त्यांचे प्रत्यार्पण करावे, अशी मागणी अंतरिम सरकारच्या वतीने भारत सरकारला करण्यात आली आहे. आम्ही स्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि सर्व संबंधितांशी बोलत आहोत, असे भारताने म्हटले आहे. मात्र, शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करणार किंवा करणार नाही, यातले काहीही अद्याप भारताने म्हटलेले नाही. यासंबंधीचा निर्णय इतका सोपाही नाही. भारताचा बांगलादेशशी प्रत्यार्पणाचा करार आहे. या करारानुसार प्रत्यार्पण बंधनकारक असले तरी आरोप किंवा गुन्हा हा राजकीय पृष्ठभूमीचा असेल तर प्रत्यार्पण नाकारले जाऊ शकते, ही बाब शेख हसीना यांच्या पथ्यावर पडणारी आहे. ती सध्या भारताच्याही सोयीची आहे. तरीही भारताला या किंवा त्या टोकाचा निर्णय लगेच घेता येणारा नाही. बांगलादेशातीलच नव्हे तर दक्षिण आशियातील गुंतागुंत आणि आंतरराष्ट्रीय घटकांच्या या नाट्यातील भूमिकाही विचारात घ्याव्या लागणार आहेत. शेख हसीना यांना बांगलादेशच्या सरकारच्या स्वाधीन करण्यास सरसकट नकार दिला तर प्रत्यार्पण कराराचा भंग केला असा आरोप होऊ शकतो. सरसकट होकार भरला तर मूलतत्त्ववाद्यांपुढे भारताचे सरकार नमले, असा अर्थ काढला जाऊ शकतो. शेख हसीना यांना या निकालाविरुद्ध भारतात राहून अपील करण्याची सोय नाही. त्यांना अपील करायचे असेल तर बांगलादेशात परत जावे लागेल. पण, त्या तिकडे गेल्या तर जिवंत राहतील की नाही, याची खात्री नाही. त्यांच्या पक्षाला अर्थात अवामी लीगला निवडणूक लढविण्याची मनाई आहे. त्यामुळे गुंता आणखीनच वाढलेला आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यावर बांगलादेशात अल्पसंख्यकांवर अनन्वित अत्याचार झाले. ते रोखावेत यासाठी भारत सरकारने अंतरिम सरकारकडे किती तरी वेळा विनंती केली. पण, मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असलेल्या अंतरिम सरकारने अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी काहीही केले नाही. उलट, गेल्या वर्षभरात बांगलादेशचे वर्तमान सत्ताधारी लोक हे पाकिस्तानशी जवळिक साधताना दिसत आहेत.

ज्या पाकिस्तानचे आपल्यावरील वर्चस्व बांगला भूमीतील लोकांना खपत नव्हते, त्यांचेच विद्यमान राज्यकर्ते पाकिस्तानच्या मांडीला मांडी लावून चर्चेची गुऱ्हाळे भरत आहेत. थोडक्यात, शेख हसीना यांना परत पाठवण्यातला धोका आणि त्यांना आश्रय देण्यामुळे निर्माण होऊ शकणारी गुंतागुंत याचा अंदाज घेऊनच भारताला पावले उचलावी लागणार आहेत. या निर्णयाला भू-राजकीय आयाम आहेत. वरकरणी एका व्यक्तीला ठोठावलेल्या मृत्युदंडाचा विषय दिसत असला तरी त्याची रक्तरंजित पृष्ठभूमी पाहिली तर बांगलादेशला मूलतत्त्ववाद्यांच्या हातात सोपवण्यास मदत होईल, अशी भूमिका घ्यायची की हा विषय हाताळण्यासाठी वेगळे कौशल्य पणाला लावायचे, हे भारताला ठरवावे लागणार आहे. भारताचे सरकार समर्थ आहे. अशी गुंतागुंत हाताळण्यासाठीही ते सक्षम आहे. भारताकडे दक्षिण आशियातील राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय समुदाय देखील आशेने पाहतो. अशा वेळी जसे काही अधिकार येतात, तशा अनेक जबाबदाऱ्याही वाढतात. भारताने सदैव आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन निगुतीने केलेले आहे. त्यामुळे भारत यावेळीही आपल्या देशाचा, दक्षिण आशियाचा आणि एकूण जगाच्या भविष्याचा विचार करूनच निर्णय घेईल, यात शंका नाही.

---

विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# विमानतळाजवळ रिअल इस्टेटचे चांगभले

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे आजूबाजूच्या परिसरात जमीन आणि घरांची मागणी वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटन झाले. त्यानंतर या विमानतळाच्या बाकी राहिलेल्या कामांना गती आली. सध्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अजून काही टप्पे पूर्ण होणे बाकी आहे. हे विमानतळ मुंबईच्या दोन्ही जुन्या विमानतळांशी जोडले जाणार आहे. नवी मुंबई विमानतळावरून पुण्याच्या दिशेने येणारा साडेतीन हजार कोटी रुपयांचा आणखी एक रस्ता तयार होत आहे. याशिवाय विमानतळाला जोडणारे कल्याणसह अन्य ठिकाणचे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. बुलेट ट्रेन विमानतळाजवळील परिसरातून जात आहे. त्यामुळे एकात्मिक गतिमान वाहतुकीचा कॉरिडॉर नव्या मुंबईत तयार होत आहे. या सर्वांचा परिणाम नवी मुंबई परिसराच्या विकासावर होत आहे. त्यामुळे रिअल इस्टेटलाही चांगले दिवस आले आहेत. पहिल्या व्यावसायिक उड्डाणापूर्वीच रिअल इस्टेटच्या किमती गगनाला भिडत आहेत. 'ॲनारॉक रिसर्च' या संस्थेच्या अभ्यासानुसार उळवे, पनवेल, तळोजा आणि खारघरमधील जमिनीच्या किमती गेल्या काही काळात ५०-६० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर घरांच्या किमती २०-४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. विमानतळाची उभारणी सुरू असल्यापासून निवासी आणि व्यावसायिक जागांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. विमानतळ असलेल्या उळवेमध्ये निवासी किमतींमध्ये सर्वाधिक ४० टक्के वाढ झाली आहे, तर खारघरमध्ये या कालावधीत २० टक्के वाढ झाली आहे.

ॲनारॉक प्रॉपर्टी कन्सल्टंट्सचे अध्यक्ष अनुज पुरी यांच्या म्हणण्यानुसार, पुढील दोन वर्षांमध्ये जमिनीच्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्के अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे. बहुतेक कॉर्पोरेट कंपन्यांनी नवी मुंबई विमानतळाजवळील जमिनी आधीच विकत घेतल्या असल्याने जमिनीच्या किमतीत आणखी वाढ झाल्यास विमानतळाच्या प्रभावक्षेत्रातील एकूण मालमत्तेच्या किमतींवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. 'स्क्वेअर यार्ड्स' या रिअल इस्टेट कंपनीचे प्रमुख भागीदार आणि मुख्य विक्री अधिकारी दीपक खंडेलवाल यांनी या परिसरातील किमतीत वाढ आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्य सरकारने नवी मुंबई परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. तिसरी मुंबई नवी मुंबईनजीक असल्याने अगोदर नवी मुंबई परिसरात विकासाचा वेग वाढला आहे. राज्य सरकारबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांनी या परिसराच्या विकासाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करून व्यवस्थित अंमलबजावणी केल्यामुळे शहराच्या अंतर्गत भागात वाहतुकीच्या



कोंडीसह अन्य समस्या येत नाहीत. आर्थिक वर्ष २०२१ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान पनवेल परिसरातील घरांच्या किमती सुमारे ७४ टक्क्यांनी वाढून दहा ते बारा हजार रुपये प्रति चौरस फूट झाल्या आहेत, तर नवी मुंबईतील उर्वरित भागात घरांच्या किमतीत ४५ टक्के वाढ झाली आहे. या भागात मालमत्तेची किंमत १९ ते वीस हजार रुपये प्रति चौरस फूटपर्यंत गेली आहे. नवी मुंबईबरोबरच विकसित झालेल्या अन्य उपनगरांच्या आणि मालमत्तांच्या किमतीपेक्षा या किमती जास्त आहेत. पनवेल भागाचे उदाहरण घेतल्यास भूखंडाचे दर सरासरी ऐंशी हजार ते ८५ हजार रुपये प्रति चौरस यार्डपर्यंत पोहोचले आहेत. त्यात झालेली ९३ टक्के वाढ ही सर्वाधिक आहे. नवी मुंबईच्या इतर भागांमधील दरांमध्ये ५८ टक्के वाढ झाली आहे. तिथे किमती जास्त आहेत. पूर्णपणे कार्यरत झाल्यावर देशातील सर्वांत मोठे विमानतळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन जवळ येताच प्रॉपर्टी डेव्हलपर्सनी अनेक प्रकल्प सुरू केले. गेल्या तीन वर्षांमध्ये नवी मुंबईत सुमारे ४५ दशलक्ष चौरस फूट निवासी जागा सुरू करण्यात आल्या. त्यापैकी सुमारे ६७ टक्के जागा फक्त चार प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांनी दिल्याचे ॲनारॉकने म्हटले आहे. या कालावधीत मुंबईत २८२ दशलक्ष चौरस फूट जागेवरील नव्या प्रकल्पांना सुरुवात झाली आहे. 'अनेक मोठे विकासक या भागात महत्त्वाकांक्षी निवासी प्रकल्प सुरू करत आहेत. त्यामुळे खारघर, पनवेल, उळवे आणि तळोजा ही प्रमुख निवासी केंद्र बनली आहेत', असे पुरी यांनी सांगितले. द गार्डियन्स रिअल इस्टेट ॲडव्हायझरीचे सह-संस्थापक आणि सीईओ राम नाईक यांना उळवेसारख्या प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांमध्ये मालमत्तेच्या मागणीत अनेक पटींनी वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. पूर्वी संभाव्य विकसनशील क्षेत्र म्हणून गणला जाणारा हा परिसर आता उच्च-मागणीच्या कॉरिडॉरमध्ये रूपांतरित होईल. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, आगामी मेट्रो लाईन्स आणि सायन-पनवेल महामार्ग विस्ताराद्वारे सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे संपूर्ण पट्ट्याला दक्षिण मुंबई आणि ठाणे या दोन्ही ठिकाणी जलद प्रवेशाचा फायदा होईल. गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नवी मुंबई त्याच्या सुवर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे, असे ते म्हणाले.

पुढील काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात निवडक ठिकाणी २० ते ३० टक्के भांडवलवाढ होऊ शकते. दर्जेदार प्रकल्प आणि वेळेवर अंमलबजावणीची क्षमता असलेले विकासक त्याचा सर्वाधिक फायदा घेऊ शकतात, तर खरेदीदारांना मुंबईतील संतृप्त बाजारपेठांच्या तुलनेत दीर्घकालीन मूल्य जास्त मिळेल. सीबीआरईचे भारत, आग्नेय आशिया, मध्य पूर्व आणि आफ्रिकाचे अध्यक्ष आणि सीईओ अंशुमन मॅगझिन यांच्या माहितीनुसार नवी मुंबई विमानतळाचा शहराच्या रिअल इस्टेटवर, विशेषतः विमानतळाच्या आसपासच्या भागात, परिवर्तनकारी परिणाम होईल. विमानतळ कर्मचारी, कार्यरत व्यावसायिक आणि विमान वाहतूक कर्मचाऱ्यांच्या गरजांमुळे विमानतळाभोवती निवासी जागांची मागणी वाढण्याची शक्यता आहे, तर लॉजिस्टिक्स पार्क, कार्यालये आणि हॉटेल्सच्या विकासामुळे व्यावसायिक मागणी वाढण्याची शक्यता आहे. मालमत्ता विकासक किमती वाढण्याबाबत तितकेच उत्साही आहेत. किमती स्थिर होण्यापूर्वी नजीकच्या भविष्यात त्या आणखी २०-२५ टक्के वाढतील. नवी मुंबई परिसरात ज्या भागात किमती वाढल्या नाहीत, त्या आता वाढतील. वाधवा ग्रुपचे एमेरिटस अध्यक्ष विजय वाधवा म्हणाले की, खारघरसारखी ठिकाणे आता महाग झाली आहेत. अलिकडेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जद्वारे संचालित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने पनवेलमधील वाधवा वाईज सिटी या टाऊनशिप प्रकल्पात वाधवा ग्रुपकडून ४०५ 'रेडी टू मूव्ह इन' फ्लॅट्स भाड्याने घेतले आहेत. नवी मुंबईचे ऑफिस मार्केट म्हणून असलेले धोरणात्मक स्थान, विमानतळाद्वारे वाढलेली कनेक्टिव्हिटी आणि जागतिक प्रवेश यामुळे पुढील काही वर्षांमध्ये या भागात ऑफिस भाडेपट्ट्याने देण्याचा व्यवसाय आणि भाडीही वाढण्याची शक्यता आहे. विमानतळाशेजारी प्रस्तावित ६६७ एकर नवी मुंबई एरोसिटी कारकीर्दीच्या संधी आणि जीवनशैलीचे मिश्रण करणारी एक नवी शहरी परिसंस्था वाढवेल. नवी मुंबई विमानतळ या परिसरातील पाच-दहा किलोमीटर भागाच्याच विकासाला हातभार लावेल असे नाही, तर शेजारच्या रायगड जिल्ह्यातील काही भागांच्या आणि प्रामुख्याने तिसऱ्या मुंबईच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

वेध

गिरीश शेरेकर

# अमरावतीत स्वबळाची व बंडखोरीची भाषा

अमरावती जिल्ह्यात १० नगरपरिषद व २ नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या सोमवार १७ नोव्हेंबर या शेवटच्या दिवसापर्यंत अध्यक्षपदासाठी १२७ तर सदस्यपदासाठी १८२१ नामांकन अर्ज दाखल झाले होते. महायुती व महाविकास आघाडीतल्या घटकपक्षांनी बहुतांश ठिकाणी स्वबळाचा नारा दिला आहे. सध्याच्या स्थितीत अन्य पक्षांच्या तुलनेत भाजपात सर्वाधिक बंडाखोरी दिसत आहे. भाजपाच्या अनेक नाराज मंडळींनी दुसऱ्या म्हणजे महायुतीत घटक पक्ष असलेल्या पक्षाचीच वाट धरली आहे. जवळपास सर्वच ठिकाणी उमेदवारी देताना निष्ठावंतांना डावलल्याची भावना तयार झाली आहे. भाजपात त्याचे प्रमाण जास्त असल्याने नाराजी व असंतोष जास्त आहे. त्याचे एक प्रमुख कारण भाजपाची उमेदवारी मागणाऱ्यांची संख्याही भरपूर होती आणि मलाच उमेदवारी मिळणार हा विश्वास अनेकांना होता. पण, उमेदवार याद्या जाहीर झाल्यानंतर त्यांच्या तोंडातून खदखद शब्दरूपाने वेगाने बाहेर पडत आहे.

जिल्ह्यात ९ वर्षांपूर्वी जेव्हा नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका झाल्या होत्या तेव्हा भाजपाचे वरूड, मोर्शी, शेंदूरजना घाट, चांदूर बाजार, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, अंजनगाव सुर्जी, नांदगाव खंडेश्वर येथे अध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले होते. विजयी सदस्यांची संख्या भाजपाचीच जास्त होती. या कार्यकाळ नैसर्गिक न्यायाने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात नाराजी वाढली होती. नव्या निवडणुकांची चाहूल लागत असतानाच कोरोना महामारीमुळे जिल्ह्यासह राज्यातल्या सर्वच नगरपरिषद व नगरपंचयातींवर प्रशासक राज आले. तेव्हापासून जिल्ह्याच्या राजकारणाच्या नदीतून बरेच पाणी वाहून गेले. काही ठिकाणी राजकीय पूर आले. दरम्यानच्याच काळात लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. वातावरण स्थिरसावर झाल्यावर या निवडणुका होत आहे. नेहमीप्रमाणे निवडणुका होतील, ही अपेक्षा बाळगून असलेल्यांना धक्का देत निवडणूक आयोगाने अत्यंत कमी वेळेतली निवडणूक प्रक्रिया जाहीर केली. त्यात काहींचे जमले तर काही हिरमुसले. त्यात आता जिल्ह्यातल्या राजकीय घराण्यातल्या काही व्यक्तींना उमेदवारी मिळाल्या आहे. अकोट मतदारसंघाचे भाजपाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नीला दर्यापूर नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. नलिनी भारसाकळे असे त्यांचे नाव आहे. त्याच प्रमाणे भाजपाचे धामणगाव रेल्वे मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी डॉ. अर्चना रोठे - अडसड यांना धामणगाव रेल्वे नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेना उबाठाचे आमदार गजानन लवटे यांनी पुत्र यश लवटे यांच्यासाठी अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी खेचून आणली आहे. आल्हाद कलोती यांनी चिखलदरा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपातून नामांकन दाखल केल्याने त्याकडे अनेकांचे लक्ष आहे. या उमेदवारींची चर्चा तर होतच आहे आणि संपूर्ण निवडणूक काळात होत राहील. इतर पक्षांतून आलेल्यांना भाजपाने काही ठिकाणी अध्यक्ष व सदस्यपदाची उमेदवारी दिल्याने नाराजी आहे. काही ठिकाणी तर नवख्या उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. काँग्रेसने स्वपक्षातल्याच उमेदवारांना संधी देताना मुस्लिम समाजाला प्राधान्य दिले आहे. इतर पक्षांमध्ये स्वतःचे व आयातीत उमेदवार आहेत. असंतोष दोन्ही बाजूने आहेच, फक्त प्रमाण कमी जास्त आहे. आता जिल्ह्यात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. महायुती व महाविकास आघाडीचे घटक पक्ष स्वबळावर निवडणूक जिंकण्याच्या तोऱ्यात आहे. त्यात त्यांना किती फायदा होईल, हे सांगता येत नाही. भाजपा फायद्यात राहू शकते पण, त्यासाठी ठिकठिकाणी उफाळलेला असंतोष त्यांना शमवावा लागेल. इतर पक्ष भाजपातील कार्यकर्त्यांच्या खदखदीवरच अवलंबून आहे. ती शेवटपर्यंत कायम राहिली तर आपले नशीब उजळू शकते, असे काहींना वाटते. त्यात काही प्रमाणात का होईना सत्यता निश्चित आहे. हा सर्व अंदाज घेऊनच भाजपाला निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. काही ठिकाणी भाजपाविरुद्ध इतर सर्व असेही प्रयत्न होत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यापर्यंत बरीच उलथापालथ होऊ शकते. भाजपाने त्यावर काम सुरू केले असेलच. त्यात त्यांना किती यश मिळते यावरच अपेक्षित निकालाचे गणित आहे. मागच्या निवडणुकीपेक्षाही भाजपाला चांगली कामगिरी करायची असेल तर चक्रव्यूह भेदावा लागेल.

९४२०७२१२२५

---

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# श्रीगीता - मोक्षसंन्यास योग

श्रीमद्भगवद्गीतेचा १८ वा अध्याय मोक्षसंन्यास योग आहे. श्रीगीतेचा हा अंतिम अध्याय आहे. या अध्यायाला कळसाध्याय असेही म्हणतात. हा अध्याय म्हणजे संपूर्ण गीतेचा अर्क आहे. एका अर्थाने ही अवतरणिकाच आहे. या अध्यायात गीतेचे सर्व अध्याय समाविक्ती आहेत. 'ज्ञानदेवा सार चोजविले' असा हा अध्याय. सिंहावलोकन करणारा हा अध्याय आहे. या अध्यायात मोक्षप्राप्तीचे गुह्यज्ञान सांगितले आहे. संपूर्ण गीतेमध्ये आपण वारंवार कर्मसंन्यास आणि कर्मफलत्याग हे दोन शब्द वाचले आहेत. त्यांना यथार्थ जाणण्याच्या दृष्टीनेच अर्जुनाने प्रश्न केला-

अर्जुन उवाच - 'सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥'

हे महाबाहो, हे हृषीकेश, संन्यास आणि त्याग या शब्दांचे सांगोपांग चिंतन ऐकण्याची इच्छा आहे. भगवंत सांगतात की, अर्जुना! काही विद्वान सर्वकर्म त्यागाला संन्यास म्हणतात तर काही सर्वकर्म त्यागालाच त्याग म्हणतात. काही विद्वान म्हणतात की, कर्म दोषयुक्त असल्यामुळे त्याचा त्याग करणे योग्य आहे तर काही म्हणतात की यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा अजिबात त्याग करू नये. भगवंत म्हणतात, अर्जुना! विद्वान काय म्हणतात ते जाऊ दे. मी काय म्हणतो ते नीट ऐक-

'यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत्।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥'

यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा त्याग करणे योग्य नाही; उलट या तिन्ही कर्माचे अनुष्ठान करावे. कारण ते चित्तशुद्धीचे साधन आहेत, पण हे तिन्ही कर्म आसक्तीने नकोत.

'एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥'

यज्ञ, दान आणि तप कर्मफळाचा त्याग करून करावीत, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यागही तीन प्रकारचा आहे. सात्त्विक, राजसिक आणि तामसिक.

'नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥'

मोहाने केलेला त्याग तामसिक त्याग आहे.

'कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ॥'

आसक्ती न ठेवता कर्मफळाचा त्याग करून केलेला त्याग हा सात्त्विक त्याग होय. खरं तर आपण देहधारी आहोत. त्यामुळे आपल्याकडून संपूर्ण कर्मांचा त्याग केवळ अशक्य आहे. जो फळाची अपेक्षा ठेवतो त्याला इष्ट, अनिष्ट किंवा संमिश्र फळ मृत्यूनंतर प्राप्त होईल. म्हणजे देवलोक, नरक किंवा पुन्हा मनुष्य लोक प्राप्त होईल; परंतु फळाची अपेक्षा न ठेवणाऱ्या पुरुषाला यातील काहीही न मिळता फक्त मोक्ष मिळतो. कर्माच्या सिद्धीसाठी भगवंतांनी वेदांतात पाच घटक सांगितले आहेत-

'अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥'

अधिष्ठान, कर्ता, इंद्रिये, इंद्रिय व्यापार आणि दैव हे ते पाच घटक आहेत. आपण जेव्हा शास्त्राला धरून किंवा शास्त्राविरुद्ध कर्म करतो त्यालाही हेच पाच घटक कारणीभूत आहेत. अजून एक सांगतो-

'यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥'

अर्जुना! जो पुरुष 'मी कर्ता' नसून 'कर्ता करविता परमेश्वर' असा शुद्ध भाव ठेवतो तो पुरुष बद्ध होत नाही. तू युद्धात सर्वांना मारले तरीही त्यांना तू मारले नाही तर त्यांना मारणारा किंवा तारणाराही मीच आहे, याची आठवण सहज भगवंत देतात. यासाठी कर्ता, कर्म आणि करण हा कर्मसंग्रह आणि ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान हे कर्मप्रेरक यावर प्रतिपादन करतात. यामध्ये ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे तीन प्रकार भगवंत सांगतात.

'सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥'

ज्या ज्ञानाने मनुष्य चराचरात भगवंत पाहतो ते ज्ञान म्हणजे सात्त्विक ज्ञान.

'पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान्।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥'

ज्या ज्ञानाने माणूस भूतमात्रामध्ये भेद करतो ते ज्ञान राजसिक ज्ञान.

'यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम्।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥'

कर्माचेही भेद भगवंत सांगतात- जे कर्म शास्त्राला धरून, फळाची अपेक्षा न ठेवता केले जाते ते सात्त्विक कर्म आहे. जे कर्म ऐहिक सुखासाठी फळाची अपेक्षा ठेवीन परिश्रमपूर्वक केले जाते ते राजसिक कर्म. जे कर्म परिणाम, हानी, हिंसा, आपल्या सामर्थ्याचा विचार न करता अविचाराने केले जाते ते तामसिक कर्म होय. भगवंत कर्त्याचे प्रकार स्पष्ट करतात-

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥'

आसक्तीरहित धैर्य आणि उत्साहाने युक्त, हर्ष किंवा शोकात निर्विकार असणारा कर्ता सात्त्विक कर्ता असतो.

'रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥'

आसक्ती ठेवणारा, दुसऱ्यांना पीडा देणारा, अशुद्ध, हर्ष आणि शोकाने परिणाम होणारा कर्ता राजसिक कर्ता आहे.

'अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥'

संस्कारशून्य, उद्धट, कपटी, विध्वंसक, आळशी असा कर्ता तामसिक कर्ता असतो. यापुढे भगवंत बुद्धी आणि धृतीचेही याच तीन प्रकारात वर्णन करतात. सात्त्विक बुद्धी ती की जिला प्रवृत्ती आणि निवृत्ती, कर्तव्य आणि अकर्तव्य, भय आणि अभय किंवा बंध आणि मोक्ष यांच्या स्वरूपाची जाण असते. ज्या बुद्धीला वरील बाबींची जाणीव नसते ती राजसिक बुद्धी. जी बुद्धी अधर्माला धर्म मानते ती तामसिक बुद्धी होय. आता धृतीसंबंधात विचार मांडला आहे. धृती म्हणजे धैर्य. धृती ही बुद्धीची प्रवृत्ती आहे. ज्या धृतीने मन, प्राण आणि इंद्रिय धारणा संयमित केल्या जातात ती सात्त्विक धृती होय. ज्या धृतीने धर्म, अर्थ आणि काम यांना धारण करून मनुष्य फळाची आकांक्षा ठेवतो ती राजस धृती होय. ज्या धृतीत निष्ठा, भय, शोक, विषाद आणि उन्माद असतो ती तामस धृती होय. भगवंताने याच अध्यायात सुखाचे तीन प्रकार सांगितले आहेत. जे सुख सुरुवातीला विषासारखे वाटते, पण त्याचा परिणाम अमृतासम असतो, ते सात्त्विक सुख आहे. जे सुख विषयभोगामुळे अमृतासमान वाटते, पण त्याचा परिणाम विषासारखा दुःखद असतो ते राजसिक सुख आहे. जे सुख झोप, आळस, प्रमाद यामुळे वाटते ते तामसिक सुख आहे.

'न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिःस्यात्त्रिभिर्गुणैः ॥'

हे अर्जुना, या त्रिलोकात एकही जीव असा नाही की, जो प्रकृतीच्या त्रिगुणातून (सत्त्व-रज-तम) मुक्त आहे. या अध्यायाच्या प्रथम लेखात एकूण ४० श्लोकांचा विचार केला असून त्यात संपूर्ण कर्माचा त्याग किंवा संन्यास योग्य किंवा हितकारक नाही. वेदप्रतिपाद्य यज्ञ, दान, तप इत्यादी कर्म, त्याचे अनुष्ठान करणे आपले इष्ट कर्तव्य आहे. अध्यायाचा दुसरा भाग पुढील भागात...

९८२२२६२७३५

---

## आजचे संघगीत-४७

बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

### नौजवान सैनिका उचल पाउला

नौजवान सैनिका उचल पाउला
पुढे चला पुढे चला ध्वनि निनादला ॥धृ.॥

मायदेश आपुला स्वतंत्र जाहला
उच्च कीर्तिशिखरिं चढविण्यास त्याजला
व्हा तयार! व्हा हुशार! घोष जाहला ॥१॥

शिवाजि शूर बाजि वीर बापू गोखले
प्रताप थोर समरवीर अमर जाहले
ती उदात्त भव्य दिव्य स्मर परंपरा ॥२॥

टिळक केशव नरेन्द्र थोर अग्रणी
रंगले स्वदेशकार्यि स्वार्थ त्यागुनी
त्यासमान देव मान देश आपुला ॥३॥

मार्ग तव तुला जरी भयाण वाटला
विपत्तिचा गिरी जरी समोर ठाकला
बेधडक तू दे धडक नि फोड त्याजला ॥४॥

---

वाचक पत्रे

## वातावरणातील बदल

दिवाळी, तुळशीचे लग्न झाले तरी बाजारपेठेतील उत्सवी वातावरण काही कमी झाले नाही. आता लग्नसराईचे दिवस सुरू झाले आहेत त्यामुळे सगळीकडे लगबग दिसू लागली आहे. आजकाल दिवाळीत थंडीची हजेरी न लागता थोडी उशिराने म्हणजे आताशी जाणवायला लागली आहे. त्यामुळे सकाळी सगळीकडे आल्हाददायक वातावरण आहे. सकाळी फिरायला गेल्यावर गरम आल्याच्या चहाचा, बुचीच्या फुलांचा दरवळ आसमंतात दरवळतो. सगळीकडे थंडीच्या कपड्यांचे सेल सुरू झाले आहेत. तिबेटीयन मार्केटमध्ये विविधरंगी ऊबदार कपड्यांचे प्रदर्शन लागले आहे. आपण नुसता फेरफटका मारला असता अनेकविध स्टायलिश तसेच पारंपरिक वूलन कपड्यांचे दर्शन होते.

आहाराची विविधता तर याच दिवसांत अनुभवण्यास मिळते. याच दिवसात अनेक समारंभाचे आयोजन केले जाते. त्यातील चटकदार गरम खाद्यपदार्थांवर जास्त भर दिला जातो. या दिवसात बाजारात फेरफटका मारणे हा अनुभव नेत्रसुखद असतो. भाज्यांच्या किमती जरा घसरल्या असतात. नानाविध हिरव्यागार भाज्यांनी गाड्या/दुकाने सजली असतात. कोथिंबीरीच्या जुड्यांना पुडाच्या वडीचे वेध लागतात. गर्मीचा प्रभाव कमी झाल्यामुळे सगळीकडे एकदिवसीय सहलीचे कार्यक्रम आखले जातात आणि निसर्गाचा आनंद घेतला जातो. मार्गशीर्ष महिन्यात गुरुवारचे महत्त्व अधिक असते. तसेच श्री मल्हारी मार्तंड षडरात्र उत्सव, नागदिवाळी, दत्त सप्ताह याच महिन्यात असतो. कफ, वात प्रवृत्ती असणाऱ्यांनी मात्र स्वतःची काळजी घ्यावी तसेच प्रत्येकाने गरजू लोकांना गरम कपडे दान करून समाजाचे ऋण फेडावे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

• • • •

## नरेंद्र मोदी नावाचे गारूड

नुकतेच आम्ही सर्व कुटुंबीय गुजरातमध्ये सहलीसाठी गेलो होतो. अहमदाबादमधील सर्व प्रेक्षणीय स्थळे, अटल ब्रिज, तेथील जवळपास शंभराहून अधिक असलेल्या १९व्या शतकातील जुन्या कार्सचे प्रदर्शन, बारा ज्योतिर्लिंगांपैकी सर्वांत प्रथम असलेले श्री सोमनाथ मंदिर, तेथील उत्कृष्ट लाईट शो, गीरचे अभयारण्य, श्रीकृष्णाने अंतिम श्वास घेतला ते भालका तीर्थ, सरदार सरोवर, धरणाच्या बाजूला उभारलेला सरदार पटेल यांचा जगातील सर्वांत उंच असलेला प्रचंड मोठा पुतळा, जुनागडचा किल्ला, किल्ल्यावरून घेतलेले गिरनारचे दूरदर्शन अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. या सहलीमध्ये सर्वांत जास्त जाणवले ते नरेंद्र मोदी नावाचे गारूड ! सरदार सरोवर परिसरात तर पटेलांच्या पुतळ्यापेक्षाही, सर्वच बाबतीत, पंतप्रधान नरेंद्र मोदींची जास्त जाहिरात आणि प्रसिद्धी केली आहे. यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. अर्थात जनताही मोदींना मनमोकळेपणाने मान देते हेही जाणवले. सरदार सरोवराजवळ असलेल्या प्राणी संग्रहालय दाखवण्यासाठी असलेल्या ई- रिक्षा फक्त महिलाच चालवतात. नरेंद्र मोदींनी आपल्या कारभारातून हा सन्मान मिळवला आहे हे वादातीत आहे. सगळीकडे प्रशस्त रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक, उत्तम शहर बस व्यवस्था, सर्वच गोष्टींमध्ये असलेली स्वस्ताई, खाद्यपदार्थांची रेलचेल, सार्वजनिक स्वच्छता, मोठी पात्रे असलेल्या स्वच्छ आणि वाहत्या नद्या, भरपूर वनराई, स्वच्छ समुद्रकिनारे अशा अनेक गोष्टींनी आमची सहल अविस्मरणीय केली. मोदी नावाच्या जादूगाराचे हे गारूड गुजराती जनतेच्या मनातून जाण्याची कोणतीही शक्यता नाही आणि भारतभर ते पसरले यातही काहीही आश्चर्य नाही.

**शिवराम वैद्य** /९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# भूसंपादन लवाद प्रकरणात मागील कालावधीतील तारखा टाकून आदेश निर्गमित करून मोठा आर्थिक अपहार झाल्याचे उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ नोव्हेंबर**

जिल्हाधिकारी बीड यांनी अपर जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय व उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांच्यासह समन्वय भूसंपादन कार्यालय, जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी बीड या कार्यालयात भेट दिली. भेटी दरम्यान काही संचिका तपासल्या व काही संशयितांच्या मोबाईल मधील संभाषण आणि उपलब्ध whatsapp माहितीवरुन समन्वय भूसंपादन कार्यालयातील लवाद / अपील प्रकरणात, जुन्या तारखा टाकून, तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करून आदेश निर्गमित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मोबाईल तपासणीत, मोबाईल मधील काही संभाषणात मागील कालावधीतील तारखा टाकून आदेश करण्यात आल्याचे वारंवार उल्लेख करण्यात आलेला आहे आणि जुन्या तारखेच्या ४० लवाद आदेश आणखी होणार असल्याबाबत सुद्धा नोव्हेंबर महिन्याच्या संभाषणात उल्लेख आहे..

याबाबत समिति गठित करण्यात आली, समितीच्या प्राथमिक चौकशीत आढळले की तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून मागील कालावधीत दिनांक १ मार्च २०२५ ते दिनांक १७ एप्रिल २०२५ पर्यतच्या आदेश कालावधी नमूद करून १५४ प्रकरणात बनावट आदेश निर्गमित झालेले आहेत आणि त्या आदेशाबाबतचा पत्रव्यवहार, संबंधित लवाद आदेशाच्या कव्हरिंग लेटरवर दिनांक १७ एप्रिल २०२५ नमूद करून संबंधित जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालयाला व उपविभागीय अधिकारी बीड कार्यालयाला १ ते ५ महिन्यानंतर आदेश प्राप्त झालेला आहे. या एकूण १५४ प्रकरणात जवळपास २४१ कोटी ६२ लक्ष रुपये वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ छत्रपती संभाजी नगर या कार्यालयाकडून अंदाजे ७३ कोटी रुपये निधी प्राप्त करून संबंधित भूसंपादन अधिकारी मार्फत वितरण झालेले असल्याने प्रथम दर्शनी ७३ कोटी रुपयाचा अपहार झाला असल्याचे ग्राह्य धरता येईल, संबंधित आदेश पारित करताना कोणतेही रजिस्टर, कोणतीही कार्यविवरण नोंदवही बाबत माहिती भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवलेली नाही. वर नमूद केल्याप्रमाणे एकाच दिवशी म्हणजे दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी ५० आदेश, तेही रोजनाम्यात कोणतेही पक्षकार हजर राहील्याबाबत स्वाक्षरी न होता झालेले आहेत, सदर बाब ही निश्चितच संशयास्पद आढळली आहे.

या गैरप्रकारातील प्रमुख कर्मचारी, संजय हांगे (सहायक महसूल अधिकारी, तहसील कार्यालय परळी), अविनाश चव्हाण (कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर, भूसंपादन समन्वय कार्यालय), शेख अजहर शेख बाबू (कंत्राटी ऑपरेटर भूसंपादन जायकवाडी प्रकल्प कार्यालय) व त्रिबंक पिंगळे (सेवानिवृत्त कंत्राटी कर्मचारी उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड), पांडुरंग पाटील (सहायक महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय कार्यालय) राऊत (राष्ट्रीय महामार्ग कार्यालय), ॲड. एस. एम. नन्नवरे, ॲड. नरवडकर, ॲड. पिसूरे, ॲड. प्रवीण राख असल्याचे प्राथमिक चौकशीत दिसून आले आहे.

लवादचे बनावट आदेश तयार करण्याच्या या गैरप्रकारतील प्रमुख अधिकारी कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात येत असून गैरप्रकार करणारे सर्व अधिकारी, कर्मचारी, वकील यांच्यावर नियमबाहय, अर्धवट सचिंका तयार करुन, त्या परिपूर्ण आहेत असे भासवुन, बनावट दस्ताऐवज तयार करुन, जुन्या दिनांका मध्ये वरीष्ठ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या करुन, सदरचे दस्तऐवज खरे आहेत असे भासवुन, त्या बाबत अर्थिक लाभासाठी नियोजीत कट करुन, स्व:तच्या आर्थिक फायदयासाठी शासनाची फसवणुक व विश्वसघात करून महाराष्ट्र जमीन संपादन अधिनियम मधील नियामावलीचे व महाराष्ट्र भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलमाचे उल्घन करुन सदरचे बनावट दस्ताऐवजावरुन शासनाची फसवणुक व शासकीय निधीचा अपहार करुन खातेदारांना वितरीत केली आहे त्यामुळे संबंधितांवर कायदेशीर फिर्याद देवून फौजदारी कार्यवाही सुद्धा करण्यात आली असल्याचे महसुलचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# गेवराईमध्ये नगराध्यक्षपदासाठी ९ तर नगरसेवकाचे २४ उमेदवारी अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ नोव्हेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जाच्या छाननीनंतर अंतिम आकडेवारी जाहीर झाली आहे. नगराध्यक्ष पदासाठी तब्बल २१ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. मात्र छाननी प्रक्रियेत यापैकी ९ अर्ज अवैध ठरविण्यात आले. १२ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहेत. तर ११ वार्डातील २२ नगरसेवक पदांसाठी एकूण १३७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीत यापैकी २४ नामनिर्देशनपत्र अवैध, तर ११३ उमेदवारी अर्ज वैध ठरविण्यात आले आहेत. अनेक प्रभागांमध्ये ७-१० उमेदवार रिंगणात असल्याने तिरंगी, चौरंगी आणि बहुकोनी लढतीची शक्यता सध्या दिसत असली तरी २१ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर लढती स्पष्ट होतील.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी उमेदवारांचा मोठा प्रतिसाद दिसून आला. भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट तसेच राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रीय कॉंग्रेस तसेच अपक्ष इच्छुकांमुळे निवडणूक विभागात दिवसभर गर्दी उसळली होती. नगराध्यक्ष पदासाठी २१ तर नगरसेवक पदासाठी तब्बल १३७ उमेदवारी अर्ज निवडणूक विभागाकडे दाखल झाले होते. दरम्यान मंगळवारी प्राप्त उमेदवारी अर्जाची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम मांडूरके, झोनल नोडल अधिकारी संजय सोनवणे यांच्या उपस्थितीत पार पडली. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. नगराध्यक्ष पदाचे ९ उमेदवारी अर्ज अवैध ठरवल्याने आता १२ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. नगरसेवक पदासाठी दाखल १३७ उमेदवारांपैकी २४ अवैध ठरवल्याने ११३ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. त्यामुळे आता अर्ज माघारीची अंतिम मुदत २१ नोव्हेंबरपर्यंत असून यानंतर निवडणूकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

# वाळूची विनापरवाना चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर यशस्वी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ नोव्हेंबर**

दि. १८/११/२०२५ रोजी दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत वाळूची विनापरवाना चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर यशस्वी कारवाई करून एकूण अडीच ब्रास वाळू आणि दोन वाहने असा मिळून १२,१५,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन्ही घटनांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पहिल्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २१.१५ वा. हॉटेल बप्पाश्री जवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर पांढऱ्या रंगाचे क्रमांक नसलेले पिकअप वाहनात आरोपी: जितीन राजेभाऊ पौळ, वय ३२ वर्षे, रा. खरात आडगाव हा एक ब्रास वाळू किंमत ६,०००/- ची अवैधरित्या वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन - ४,००,०००/- व एक ब्रास वाळू असा एकूण - ४,०६,०००/- चा मुद्देमाल जप्त करुन त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं.: २९४/२०२५ कलम: ३०३(२) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसर्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २२.१५ वा. लोनगाव चौकाजवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर आरोपी जीवन काशिनाथ साळवे, वय ३० वर्षे, रा. खरात आडगाव, ता. माजलगाव हा त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक ४०७ टेम्पो क्र. चक२१ द ०३५३ मध्ये अवैधरीत्या दीड ब्रास वाळू किंमत- ९,०००/- वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील टेम्पो वाहन किंमत - ८,००,०००/- व दिड ब्रास वाळू असा एकूण - ८,०९,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं.: २९५/२०२५ कलम: ३०३(२) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड, यांच्या मार्गदर्शनात सपोनि. महादेव ढाकणे, पोउपनि. पवनसिंग जंघाळे,पोह/१७६ भराडे,पोशि/३६० सचिन गायकवाड यांनी केली आहे.

# माजी आ.लक्ष्मण पवार मैदानात उतरल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ नोव्हेंबर**

प्रदीर्घ विश्रांतीनंतर गेवराईचे माजी आमदार लक्ष्मण आण्णा पवार हे नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. त्यांच्या उपस्थितीत काही उमेदवारांचे उमेदवारी अर्जही दाखल करण्यात आले आहेत. ते प्रचारामध्ये देखील सक्रिय सहभागी झाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार लक्ष्मण आण्णा पवार हे



विधानसभा निवडणुकीनंतर राजकारणामध्ये फारसे सक्रिय नव्हते. त्यामुळे भाजपाचे युवानेते बाळराजे पवार यांनी सक्रिय होत मतदार संघात नव्याने मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. त्यातच नगरपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून नगराध्यक्षपदासाठी सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांना भाजपाकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. विशेष बाब म्हणजे या निवडणुकीमध्ये माजीमंत्री बदामराव पंडित यांनी बाळराजे पवारांना खंबीर साथ देण्याचा निर्णय घेतल्याने पवारांसाठी ही जमेची बाजू झाली आहे. त्यातच गेवराईचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार हे देखील प्रदीर्घ विश्रांतीनंतर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. त्यांच्या उपस्थितीत काही जणांचे उमेदवारी अर्जही दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्या एन्ट्रीमुळे पवार समर्थक व भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहावयास मिळत आहे.

# अट्टल महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राला केंद्रीय क्रीडा महोत्सवात तीन पारितोषिके

### केंद्रीय क्रीडा महोत्सवात अट्टल महाविद्यालयाच्या खेळाडूंना सुवर्ण पदके

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ नोव्हेंबर**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आयोजित केंद्रीय क्रीडा महोत्सव स्पर्धेत मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयातील अभ्यास केंद्राला बॅडमिंटन क्रीडा प्रकारात दोन सुवर्ण पदक व ऐक कांस्यपदक प्राप्त झाले आहे. यामध्ये यश चिताम्बर चंदनशिव आणि अस्मिता खडकीकर यांना सुवर्णपदके तर सानिध्य पगारे याने कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

या तीनही खेळाडूंची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी आणि राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माजी आ. अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, केंद्र संचालक प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, उपप्राचार्य डॉ. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रबंधक भास्कर सुरवसे, केंद्र संयोजक डॉ. ए. जे. शिरसाट, सहाय्यक डॉ. एच. बी. हेळंबे, विशाल तायडे, रावसाहेब पवार, वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख प्रा. अरुण भराडे, डॉ. रवींद्र खरात, क्रीडा प्रशिक्षक प्रा. फुलारे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.पल्लवी गरड ला कांस्यपदक

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ नोव्हेंबर**

पी. इ. एस. शारीरिक शिक्षण महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत अंतर महाविद्यालयीन थलेटिक्स क्रीडा स्पर्धेत पल्लवी गरड हिने ८०० मी. धावणे प्रकारामध्ये तृतीय क्रमांक मिळवला.

या विद्यार्थिनीला प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.या यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कवळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक. प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. डॉ. नितीन ढवळे , प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. एकनाथ मस्के, बनसोडे .आदींनी अभिनंदन केले.





# नंदकिशोर मुंदडा यांनी राजकिशोर मोदी यांच्या नामनिर्देशन अर्जावर घेतलेला आक्षेप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ नोव्हेंबर**

अंबाजोगाई लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर कांताप्रसाद मोदी यांच्या उमेदवारी अर्जावर विरोधी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतलेल्या आक्षेपाचे खंडन करून तो आक्षेप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळला . मंगळवार दि १८ रोजी नामनिर्देशन अर्जाच्या पडताळणी मध्ये कोणताही दोष किंवा त्रुटी आढळुन न आल्याने राजकिशोर मोदी यांचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज वैध ठरला गेला.

नगर परिषद निवडणुका जाहीर झाल्या पासूनच लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांना कोंडीत पकडण्यासाठी वारंवार साम, दाम, दंड ,भेद असे सर्व प्रकार विरोधकांनी वापरून रडीचा डाव सुरू केला आहे.राजकिशोर मोदी यांच्या सहकार्यांना विविध आमिषे , दडपशाही ,धमक्या देऊन त्यांचे भारतीय जनता पक्षात पक्ष प्रवेश घडवून आणले. तरी सुद्धा जनतेच्या मनातील राजकिशोर मोदी यांच्या बद्दलची आपुलकीची भावना कमी होत नसल्याने विरोधक बिथरून गेल्याचे दिसून येत आहेत. एवढे करूनही राजकिशोर मोदी हे कुठेच व कशातच कात्रीत सापडत नसल्याचे लक्षात येताच त्यांना आता कागदपत्रांत कोठे गाठता येते का? आणि काहीपण करून मोदी यांना निवडणुकीतून बेदखल करता येते का? यासाठीचे प्रयत्न भारतीय जनता पक्ष तथा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांच्याकडून केल्या जात आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर मंगळवार दि १८ रोजी अर्ज पडताळणीची प्रक्रिया पार पडली.यामध्ये राजकिशोर मोदी यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात क्रमांक पाचच्या रकान्यात जातीचा उल्लेख केल्याचा किरकोळ व तोंडी आक्षेप प्रतिस्पर्धी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतला. पण अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याने दाखल केलेल्या अर्जात जातीचा उल्लेख केला किंवा नाही केला तरी फरक पडत नाही असे निवडणुक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी स्पष्ट करत मुंदडा यांनी घेतलेला आक्षेप साफ फेटाळून लावला. याउपर सुद्धा आक्षेप घ्यायचा असेलच तर लेखी स्वरूपात आपला आक्षेप घ्यावा असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले. पण आक्षेप घेण्याची मुदत संपेपर्यंत विरोधकांकडून कसलाच लेखी आक्षेप आला नाही. याबाबत आमच्या प्रतिनिधींशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी विरोधकांनी रडीचा डाव न खेळता नैतिक मार्गांचा अवलंब करून निवडणूक लढवावी असे आवाहन त्यांनी केले. आजपर्यंत त्यांनी माझ्यावर अनेक बिनबुडाचे आरोप केले, पण एकसुद्धा आरोप ते सिद्ध करू शकले नसल्याचे मोदी यांनी सांगितले. विरोधकांच्या दडपशाहीला , आर्थिक आमिषाला आणि खोट्या प्रचाराला अंबाजोगाई ची सुजाण जनता बळी पडणार नाही हे निकालातुनच दिसून येईल असा ठाम विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलून दाखवला.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७

जा.क्र. दीन/मु.का./वसुली/०८/एचवायपी-१०/१८३/२०२५-२६ दिनांक-१९.११.२०२५

परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार
**मालमत्ता विक्रीची सुचना**
**विक्री नोटीस (अचल मालमत्ता)**

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही १.**कर्जदार** मे. महालक्ष्मी ॲटोमोबाईल प्रोप्रा महादेव भानुदास पटवारी (मयत) त्यांचे कादेशीर वारस **१.** पार्वतीबाई महादेव पटवारी (पत्नी) **पत्ता:-** समता नगर, अंबीका देवी मंदीर जवळ, उदगीर , जि. लातुर ४१३ ५१७ **२.** श्री. कृष्णा महादेव पटवारी (मुलगा) **पत्ता:-** समता नगर, अंबीका देवी मंदीर जवळ, उदगीर , जि. लातुर ४१३ ५१७ **२.जामीनदार** श्री. काळे प्रभाकर गोपाळराव **पत्ता:-** विद्यावर्धीनी हायस्कुल, उदगीर ,जि लातुर ४१३ ५१७ **३.जामीनदार** श्री. पेढे अंकुश ग्यानोबा **पत्ता:-** स्वाती ॲग्रो एजन्सी, नांदेड बीदर रोड, उदगीर , जि.लातुर ४१३ ५१७

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **२२.०६.२०१६** रोजी दस्त क्रं.३९७०/२०१६ रु.८,००,०००/-(अक्षरी रु.:- आठ लाख रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत मालमत्तेचा ताबा दिनांक ०७.०१.२०२५ रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांतगत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३१.१०.२०२५** रोजी थकीत रक्कम **रु.१५,०५,९०७/-(अक्षरी रु.पंधरा लाख पाच हजार नऊशे सात रु.)** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**उदगीर** या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **उदगीर** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक **१९.१२.२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**
**(मालमत्ता धारक :-** महादेव भानुदास पटवारी**)**
मे. महालक्ष्मी ॲटोमोबाईल प्रोप्रा. महादेव भानुदास पटवारी यांची कर्ज प्रकरणात तारण स्थावर मालमत्ता गहाणदार महादेव भानुदास पटवारी उदगीर नगर परिषद हद्दीतील स.नं. ३१२/२,प्लॉ.नं.९, मा.क्र.४-१-८८५ क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम-२५ X दक्षिण-उत्तर-२० एकुण क्षेत्रफळ ५००स्वे.फु. उदगीर जि.लातुर त्यांच्या चुत:सिमा खालीलप्रमाणे-
**पुर्व-** जबार उस्ताद यांची जागा
**पश्चिम-** प्लॉट क्र.०८
**दक्षिण-** मोकळी जागा आणि १२ फु. रस्ता
**उत्तर-** प्लॉट क्र.०७
(वरील मालमत्ता “जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत’)

**१.मालमत्ता राखीव किंमत रु.१०,८०,०००/-(अक्षरी रु.: दहा लाख ऐंशी हजार फक्त)**
**२.अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रु.:-**पाच हजार फक्त**).**

**क्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त) नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-उदगीर शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**उदगीर** येथे दिनांक **१९.१२.२०२५** सायं.०१.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राखी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक **२४.१२.२०२५** रोजी दुपारी ०३.०० वाजता बँकेच्या शाखा-उदगीर येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
७. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे.
९. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय,उदगीर वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ७६६६५७७९०० पत्ता शाखा-उदगीर मो.क्र.९०४९९९८२९७ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
१०. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
११. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

स्थळ:- उदगीर
दिनांक:-१९.११.२०२५

अधिकृत अधिकारी,
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
(सिक्युअर्ड क्रेडीटर)
मो. ७६६६५७७९००

# ग्रामीण पोलीसांनी केला दोन महाकाय बोटीसह ८५ लाखाचा मुद्देमाल जप्त



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ नोव्हेंबर-**

अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या दोन महाकाय बोटी एका कंटेनर मधून गोदाकाठी घेऊन जात असल्याची गुप्त माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळताच त्यांनी चंदासिंघ कॉर्नर येथे जाऊन कंटेनर व त्यावर असलेल्या दोन महाकाय बोटी असा एकूण ८५ लाखाचा मुद्देमाल नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी जप्त केले.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत होणारी वाळूची तस्करी थांबवण्यासाठी नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी कडक कारेवाही करत वाळू उपसा करणाऱ्यावर जप्ती करण्यात येत आहे. पोलीस ठाणे हद्दीतील सर्व वाळू घाटावर स्वतः जाऊन धाडी टाकून वाळू माफिया वर कारेवाही केली जाते. यातच दिनांक १७ नोव्हेंबर रोजी वाळू माफिया कडून गोदावरी पात्रातील वाळू उपसण्यासाठी मोठ्या दोन महाकाय बोटी घेऊन जात असलेला कंटेनर क्रमांक एम एच ५३ बी-- ०३०३ यास अडून विचारपूस केली असता कंटेनन्सचे चालक उडवा उडवी चे उत्तर देत असल्याने त्या ताब्यात घेऊन सखोल तपासणी केल्यास सदरील बोटी वाळू उपसासाठी नेत असल्याचे सांगितले तेव्हा दोन बोटी व कंटेनर असा एकूण ८५ लाखाचा मुद्देमाल ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेऊन चालकावर गुन्हा नोंद करण्यात आला. या कारेवाहीमुळे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ग्रामीण ठाण्याचे पो.नि. ओमकांत चिचोलकर यांच्यासह पोहेकॉ. शेख इब्राहिम, पोहेकॉ. भोसले, माने, मारवाडे यांचे कौतुक केले.

## मतदान व मतमोजणीच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार राहणार बंद

**नांदेड**-जिल्ह्यात नगरपरिषदा व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक मतदानाच्या दिवशी मंगळवार २ डिसेंबर २०२५ व बुधवार ३ डिसेंबर २०२५ मतमोजणीच्या दिवशी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट अँड फेअर अॅक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमीत केले आहेत. नगरपरिषद व नगरपंचायत मतदार संघात मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान व बुधवार ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. त्याअनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहे. मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. बिलोली येथे जनावराचा बाजार तर कुंडलवाडी, उमरी, लोहा येथे आठवडी बाजार तर मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच ३ डिसेंबर २०२५ रोजी हिमायतनगर याठिकाणचे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार ४ डिसेंबर २०२५ रोजी भरविण्यात यावेत, असे आदेश निर्गमित केले आहे.

## मोटार सायकल वाहनांसाठी नवीन मालिका सुरु

**नांदेड** -परिवहनेत्तर संवर्गातील मोटार सायकल वाहनांसाठी एमएच २६-सीझेड ही नवीन मालिका लवकरच सुरु होणार आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक व ईमेलसह अर्ज १९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० पर्यत स्विकारण्यात येणार आहे. तसेच या अर्जासोबत संबंधित पसंती क्रमांकाच्या शुल्काचा धनादेश डीडी सुध्दा सादर करावा. विहित केलेल्या दिनांक व वेळेनंतर पसंतीक्रमासाठी अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. ज्या पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास १९ नोंव्हेंबर २०२५ रोजी ४ वाजता टेक्स्ट मॅसेज दुरध्वनीद्वारे संबंधीत अर्जदारास कळविण्यात येईल. तरी सर्वांनी याबाबतची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## सैनिकी मुलांचे वसतीगृह विष्णुपुरी येथे कंत्राटी पध्दतीने भरती

**नांदेड** - सैनिकी मुलांचे वसतीगृह विष्णुपुरी येथील वसतीगृहामध्ये कंत्राटी पद्धतीने माजी सैनिक विधवा व अवलंबितांमधून पदे भरावयाची आहेत. माजी सैनिक विधवा / अवलंबित उपलब्ध नसल्यास पदे नागरी सिवीलन संवर्गातून भरण्यात येणार आहेत. स्वयंपाकी (महिला) या २ पदासाठी किमान एक वर्ष अनुभव वयोमर्यादा २१ ते ५० वर्षे पात्रता असावी. तरी या पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड येथे २५ नोव्हेंबर २०२५ पर्यत अर्ज दाखल करावेत. अधिक माहितीसाठी वसतीगृह अधीक्षक यांचा मोबाईल क्रमांक ८३८०८७३९८५ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा-२०२५ रविवार २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत तर दुपारी २.३० ते ५ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील ५१ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार या परीक्षा केंद्रापासून शंभर मिटरच्या परिसरात रविवार २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या शंभर मिटरपर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील शंभर मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स,एस.टी.डी., आय. एस.डी.,भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

## ऊस तोडणीसाठी पैशाची मागणी होत असल्यास अधिकाऱ्यांशी संपर्क करावा

**नांदेड** -ऊस तोडणी मजूर व मुकादम व वाहतूक कंत्राटदार यांचेकडून ऊस तोडणीसाठी रोख पैशाची व अन्य वस्तू व सेवा यांची मागणी होत असल्यास शेतकऱ्यांनी तक्रार निवारण अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी. संबंधित तक्रार निवारण अधिकारी यांनी तक्रारीचे निराकरण न केल्यास, कार्यालयाच्या ई-मेल ीक्षवीपरपवशवीशवळषषारळश्र. ले वर तक्रार करावी किंवा ०२४६२-२५४१५६ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन प्रादेशिक सहसंचालक (साखर) विश्वास देशमुख यांनी केले आहे. राज्यात २०२५-२६ गाळप हंगामात उपलब्ध असलेला सर्व ऊस सर्वसाधारणपणे १४५-१५० दिवसात गाळपा होईल एवढी साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढली आहे.

**तक्रार निवारण अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक**

भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि. यु-१, लक्ष्मीनगर ता. अर्धापूर साठी आर.टी.हरकळ-८३७८९९०७६०, सुभाष शुगर प्रा.ली. हडसनी ता. हदगाव के.बी. वानखेडे-९४२३४३६६२१, एम.व्ही.के.ग्रो फुडस प्रॉडक्टस लि. वाघलवाडा, उमरी ता. नांदेड एम.जी.गाडेगांवकर-९८५०६४१७०९, कुंटूरकर शुगर अँन्ड अँग्रो प्रा.ली. कुंटूर ता. नायगाव साठी एस. देशमुख- ९४२३५०८४३७, ट्वेंटीवन शुगर लि. यु-३ शिवणी, ता. लोहा साठी एस.ए. पंतगे-७०३०९०८५२८, शिवाजी सर्व्हीस स्टेशन, मांजरी, बाऱ्हाळी ता. मुखेड साठी एस.जी.माळेगावे-९३५९१६४९८८ याप्रमाणे तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नावे व संपर्क क्रमांक आहेत .शेतकऱ्यांनी ऊस तोडणीबाबत काही तक्रारी असल्यास यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक सहसंचालक साखर कार्यालयाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## संचखेड बोर्ड कर्मचारी पतसंस्थेतील सभासदत्वात अनियमितता? सहकार विभागाचा नोटीसद्वारे संस्थेला इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ नोव्हेंबर-**

संचखेड बोर्ड कर्मचारी पतसंस्था मर्यादित, नांदेड येथील सभासदत्व प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप होत असून, याची दखल घेत सहकार उपनिबंधक कार्यालयाने संस्थेला अधिकृत नोटीस बजावली आहे.

प्राप्त माहितीनुसार, संस्थेचे सभासद म्हणून नाव असलेल्या श्री. जगदीप सिंघ हजुरा सिंग चव्हाण, इंद्रपाल सिंघ फौजी हरजिंदर सिंघ गुरमुख सिंग हुदंल हरदेव सिंघ जितसिंग रागी, चरणजीतसिंग महेंद्रसिंघपुजारी आणि तेजपाल सिंघ राजकमलसिंग गाडीवाले यांनी सभासदत्वाशी संबंधित तक्रार सादर केली होती. तक्रारीत, पतसंस्थेने चुकीची माहिती देत संबंधित सदस्यांना सभासद नसल्याचे सांगितल्याचा उल्लेख करण्यात आला होता.

मात्र सहकार विभागाच्या प्राथमिक तपासात, संबंधित व्यक्तींची नावे पतसंस्थेच्या नोंदीमध्ये अस्तित्वात असून काही सदस्यांचे कर्ज व्यवहारही नोंदलेले असल्याचे समोर आले आहे. संस्थेने दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष नोंदीमध्ये मोठी विसंगती असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यात सहकार विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २२ चा उल्लेख करत, सभासदत्वाबाबत चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती देणे हा कायद्याचा भंग असल्याचे नमूद केले आहे.


उपनिबंधकांनी संस्थेला सर्व कागदपत्रांसह संपूर्ण स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले असून, नियोजित वेळेत अहवाल न दिल्यास संबंधित संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

या कारवाईमुळे पतसंस्थेतील कार्यप्रणालीवर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाले असून, सदस्यांमध्येही नाराजीचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# मुदखेड मध्ये नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेस व भाजपाची खरी लढत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १९ नोव्हेंबर-**

मुदखेड नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक दि.२ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून नगराध्यक्षाची निवड थेट जनतेतून होणार आहे भाजपाकडून.सौ विश्रांती माधव कदम. आणी काँग्रेसकडून सौ शीलाताई राजबहादुर कोत्तावार हे निवडणूक रिंगणात असून यांच्यातच अटीतटीची निवडणूक होईल असे जनतेतून बोलल्या जात आहे या निवडणुकीत भाजपा काँग्रेस बरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार. शिवसेना शिंदे गट.बहुजन समाज पार्टी वंचित बहुजन आघाडी एम आय एम. माजी नगराध्यक्ष मुजीब जागीरदार यांनी देखील आपल्या मुलीचा



उमेदवारी नगराध्यक्ष पदासाठी दाखल केली आहे. भाजपा व काँग्रेसमध्ये उमेदवारी देण्यावरून बरेच मतभेद झाल्याचे दिसून आले काही निष्ठावंतांना डावळण्यात आले तर या पक्षातून त्या पक्षात गेलेल्या उमेदवारांना उमेदवारी नगरसेवक पदासाठी देण्यात आली आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदापासून ते नगरसेवक पदापर्यंत अपक्षाची गर्दी अजून तरी कायम आहे. दि.२१ डिसेंबरला अर्ज मागे घेतल्यानंतरच या निवडणुकीत कोण रिंगणात राहतील हे चित्र दिसून येईल असे असले तरी ही निवडणूक म्हणजे भाजपा. खासदार अशोक चव्हाण. काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण तसेच राष्ट्रवादीचे आमदार.

प्रताप पाटील चिखलीकर हे या निवडणुकीत लक्ष घालून प्रतिष्ठा पणाला लावतील असे जाणकाराचे मत आहे मुदखेड मध्ये मुस्लिम समाजाची मतदार संख्या सर्वात जास्त असून त्या पाठोपाठ दलितांची मतदार संख्या आहे या निवडणुकीत ह्याच दोन समाजाचे मते निर्णायक आहेत ते जिकडे जातील तेच नगराध्यक्ष होऊ शकते हे मात्र निश्चित.

## नांदेड ग्रामीण पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत एका आरोपीस स्थानबद्ध करण्यास यश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ नोव्हेंबर-**

नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखणे व समाजातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी कठोर पावले उचलली आहेत वाळू तस्करी करणाऱ्या गुन्हेगारास एम पी डी ए अंतर्गत जिल्हा दंड अधिकारी राहुल कर्डिले यांच्या शिफारशीनुसार अवैद्य वाळू तस्करी करणारा स्वप्निल चौदंते यास नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी एक वर्षासाठी स्थानबद्ध करून हर्सुल कारागृहात जेरबंद केले.

नांदेड जिल्ह्यात वाळू तस्करी आळा बसावा यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार व जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी दीर्घ काळापासून वाळू तस्करी करणाऱ्या लोकांवर एमपीडीए अधिनियमाप्रमाणे गुन्हेगारास पकडून त्यांना स्थानबद्ध करण्याची मोहीम राबवली आहे. या मोहिमेनुसार नांदेड



ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी वाळू तस्कर स्वप्निल दिलीप चौदंते वय २३ वर्ष राहणार नई आबादी मुदखेड ता्. मुदखेड याच्यावर एमपीडीए अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात आला असुन स्वप्नील चौदंते यास एक वर्षाची स्थानबद्धतेची कार्यवाही करून हर्सुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे जेरबंद करण्यात आले. सदरील कार्यवाहीमुळे सराईत गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

## 'तुमची बाकी निल करु' या आश्वासनवर तरुणांचा पक्षप्रवेश !

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १८ नोव्हेंबर-**

आगामी नगरपरिषद निवडणुकीत आपल्या बाजूने वातावरण निर्माण करण्यासाठी एका पक्षाकडून जबरदस्त प्रलोभनांची ऑफर सुरू केल्याची चर्चा सध्या शहरात वेगाने पसरत आहे. 'तुमची बाकी निल करु' या आश्वासनवर एका पक्षाकडून तरुणांचा पक्षप्रवेश घडवून आणला जात असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

ज्या तरुणांचा पक्षप्रवेश घडवून आणला जात आहे, त्या तरुणांवर बाकी (कर्ज) नेमकी कशाची आहे? त्यांच्यावर ही बाकी कोणी केली? या तरुणांना वाईट मार्गावर कोणी खेचलं? आणि ही बाकी (कर्ज) त्या तरुणांनी व्यवसाय, लग्न, नौकरी किंवा कुटूंबाच्या भल्यासाठी लावलं का? या प्रश्नांची उत्तरे निवडूकीच्या निकालाअंतीच मिळतील.

स्थानिक जाणकारांच्या मते, काही तरुणांना मागील काळात चुकीच्या मार्गावर काही लोकांनी खेचले गेले होते. त्या काळात निर्माण झालेल्या अडचणींना 'बाकी'चे नाव देत आज त्या अडचणी मिटवण्याच्या मोबदल्यात राजकीय निष्ठा मागितली जात आहे. परंतु ज्यांनी अडचणीत आणले तेच आज 'नील करून देऊ' म्हणत आहेत अशी टिप्पणी नागरिकांतून ऐकायला मिळत असून, या आश्वासनामागे नेमके सत्य काय आहे याबद्दल स्पष्टता नाही. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर दिली जाणारी ही प्रलोभनाची ऑफर फसवी तर ठरणार नाही ना?

सध्या निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. अशा वेळी अशा प्रलोभनांना जनता बळी पडेल का? मतदारांना अशाप्रकारे प्रभावित करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील का?

हे सर्व प्रश्न उपस्थित होत असून, अंतिम उत्तर मात्र मतदारच देऊ शकतील. तेही आपले मतदानाचे हक्क बजावत !

## जागतिक शौचालय दिनानिमित्त हमारा शौचालय, हमारा भविष्य मोहिम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ नोव्हेंबर-**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) विभागामार्फत हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहिम आजपासून सुरू करण्यात येत आहे. ही मोहीम मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. शौचालये ही केवळ सोयीची नव्हे तर आरोग्य, प्रतिष्ठा व सुरक्षिततेची हमी देणारी मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली सार्वजनिक शौचालये यांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



या कालावधीत शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिस्सारण तसेच हवामान अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत गावागावांत मोहिमेचे विविध उपक्रम राबविण्यात येतील. उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये यांना अंतिम टप्प्यात विशेष गौरव करण्यात येणार आहे. १० डिसेंबर रोजी मोहिमेचा समारोप करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील. तरी या मोहिमेत सर्व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी केले आहे.

## उत्तमराव कदम यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १८ नोव्हेंबर-**

माहुर तालुका खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक उत्तमराव किशनराव कदम (६६ वर्षे) यांचे त्यांच्या राहते घरी कुपटी येथे आज सोमवार दि. १७ नोव्हेंबर रोजी पहाटे ०५:०० वाजता अकस्मात निधन झाले.

स्व.उत्तमराव कदम हे माहुर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती विश्वनाथ कदम आणि माहूर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.अनिताताई विश्वनाथ कदम यांचे पुतणे होते. त्यांचे पश्चात आई, पत्नी, मुलगा, सुन व दोन विवाहीत मुली, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# जांब सर्कलचे लोकनियुक्त सरपंच वसंत गायकवाड जिल्हा परिषदेसाठी भाजपाचे प्रबळ दावेदार

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १९ नोव्हेंबर-**

जांब बु ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच वसंत एकनाथराव गायकवाड हे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत जांब सर्कलमधून भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक चर्चेत असलेले प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. त्यांच्या प्रामाणिक, पारदर्शक, सर्वसमावेशक आणि विकासाभिमुख कार्यशैलीमुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल ठाम विश्वास निर्माण झाला आहे.

सह-दुय्यम निबंधक पदावरून सेवा निवृत्त झालेल्या वसंत गायकवाड यांनी सरकारी सेवेत स्वच्छ, पारदर्शक आणि आदर्श कामकाजाचा उच्च दर्जा राखला. शासनाच्या कार्यपद्धतीची अचूक जाण असल्यामुळे त्यांनी प्रशासनिक अनुभवाचा प्रभावी उपयोग ग्रामविकासात केला. जांब बु ग्रामपंचायतीत थेट जनतेतून सरपंच म्हणून एकतर्फी अपक्ष विजयी होत त्यांनी यशस्वीपणे तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण केला. सरपंच झाल्यानंतर त्यांनी आमदार डॉ. तुषार



राठोड यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्त्वपूर्ण शासकीय योजनांतून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला. स्थानिक भाजप नेते मनोजराव गोंड (माजी उपसभापती, पंचायत समिती मुखेड प्रभाग) व ग्रामपंचायत सदस्यांच्या यांचा समन्वय ठेवुन गावचा विकास गतीमान झाला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामांना नवसंजीवनी मिळाली आहे. जिल्हा नियोजन समिती व विविध राज्य शासन योजनांमधून सर्व समाजघटकांच्या गरजांना प्रतिसाद देणारी अनेक कामे त्यांनी राबवली. काही प्रकल्प पूर्ण, तर काही वेगाने सुरू असून काही नव्याने मंजूर प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत. वसंत गायकवाड यांच्या कार्यशैलीबद्दल ग्रामस्थ, महिला-पुरुष मतदार, युवक व स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठी सकारात्मक लाट आहे. जांब जि.प. गटातील सर्व भाजप सदस्यांनी माजी उपसभापती मनोजराव गोंड यांच्या नेतृत्वात वसंत गायकवाड यांचे नाव जिल्हा परिषदेसाठी अधिकृत उमेदवार म्हणून द्यावे, अशी ठाम मागणी केली आहे. जांब बु गटात निवडणुकीचे वातावरण तापत असताना, वसंत एकनाथराव गायकवाड हे जिल्हा परिषद निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेत असलेले केंद्रबिंदू ठरत आहेत.


**जाहीर समन्स/नोटीस**

एम.एम. पी. अर्ज नं. ४३/२०२४

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ट स्तर सो. यांचे न्यायालयात**

श्री. प्रफुल्ल माणिक परदेशी — अर्जदार
विरुध्द
सौ. सविता प्रफुल्ल परदेशी — सामनेवाली

**प्रति,**
**सौ. सविता प्रफुल्ल परदेशी**
रा. द्वारा अरुण तोकलवाल
मु.पो. टेंभूणी, ता. नायगांव, जि. नांदेड
... सामनेवाली
.....यांना

**ज्याअर्थी,**

सदरचा अर्ज यातील अर्जदार याने सामनेवाली हिचे विरुध्द हिंदू विवाह कायदा कलम १२ (१) प्रमाणे दाखल केलेला आहे. तुम्ही सामनेवाली अर्जात नमूद पत्त्यावर राहत आहे. सदर पत्त्याबर तुम्हांला मे. कोर्टाचे मार्फत रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठविली होती व सदर रजिष्टर पोष्टाची नोटसौ तुम्ही घेतलेली आहे. तरीही तुम्ही मागील तारीख २९/१०/२०२५ रोजी में. फोर्टात हजर राहिला नाहीत. तरीहि मे. कोर्टानी जाहीर समन्स नोटीशीचा तुमचे विरुध्द आदेश दिला आहे. त्याप्रमाणे हे जाहीर समन्स / नोटीस मे. कोर्टाचे मार्फत देत आहे. त्याअर्थी,

तुम्ही सामनेवाली हिने सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ३/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता में, कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून में, कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फी आदेश होतील, मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स/नोटीस में, कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली.
ता.१२।११। २०२५
क. लिपीक

**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर**
**बार्शी,ता. वार्शी, जि. सोलापूर**

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी बाजार समितीत शुक्रवारपासून खाजगी कापूस खरेदीचा प्रारंभ

**पूर्णा,/प्रतिनिधी :** परभणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टीएमसी मार्केट यार्डात शुक्रवार २१ नोव्हेंबरपासून खाजगी व्यापाऱ्यांमार्फत कापुस खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी लिलावाची पावती घेऊनच वाहने जिनिंगवर आणावीत, असे आवाहन बाजार समितीचे सभापती पंढरीनाथ घुले यांनी केले आहे.

टिएमसी मार्केट यार्डात कापुस लिलाव प्रक्रिया पार पाडल्यानंतर सौदापट्टी घेऊन शेतकऱ्यांनी दुपारी १२ वाजेपर्यंत मार्केट यार्डात वाहने आणावी, त्यानंतर आलेल्या वाहनधारकांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच कापूस विक्रीस आणतांना शेतकऱ्यांनी चांगल्या व खराब प्रतिचा कापसाची वर्गवारी करून आणावी, जेणेकरून योग्य बाजारभाव मिळेल. तसेच बाजार समिती कार्यक्षेत्रात अनाधिकृत खरेदी आढळल्यास बाजार समितीस संपर्क साधावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती पंढरीनाथ घुले, उपसभापती अजय चव्हाण, सर्व संचालक मंडळ आणि सचिव संजय तळणीकर यांनी केले आहे.

### मनपाच्या कचरा संकलनात कंत्राटदाराद्वारे प्रचंड गैरप्रकार ; युवक काँग्रेसकडून कंत्राटदाराविरोधात कठोर कारवाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** महापालिका क्षेत्रातील कचरा संकलनासाठी नियुक्त केलेल्या 'आयसीटी बेस्ड एजन्सी' प्रत्यक्ष कचरा न उचलता फक्त घराबाहेर लावलेले क्यूआर कोड स्कॅन करून महानगरपालिकेच्या मोबाईल ॲपवर कचरा संकलन केल्याची नोंद करीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करीत असल्याचा आरोप परभणी जिल्हा युवक काँग्रेसने केला आहे.

या प्रकाराला बोगस स्कॅनिंगचे स्वरूप असून, संबंधित एजन्सीवर तात्काळ कठोर कारवाई करून आतापर्यंतची सर्व नोंदणी रद्द करावी, अशी मागणी बुधवारी (दि.१९) महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

नागपूर येथील आयसीटी बेस्ड या एजन्सीला परभणी शहरातील घराघरातून घंटा गाडीमार्फत कचरा संकलनाचे कंत्राट देण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात घंटा गाड्या नियमितपणे न फिरता घरांवर लावलेले क्यूआर कोड स्कॅन करून ॲपवर खोट्या नोंदी केल्या जात असल्याचा युवक काँग्रेसचा आरोप आहे. त्यामुळे मनपा कर्मचारी आणि कचरा संकलन एजन्सी एकमेकांची पाठराखण करीत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

कचरा उचलल्या शिवाय कोणत्याही प्रकारचे स्कॅनिंग करू नये, आतापर्यंत झालेले सर्व बोगस स्कॅन रद्द करावे तसेच दोषी एजन्सी आणि संबंधित मनपा कर्मचार्यांवर कठोर कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या युवक काँग्रेसने मांडल्या आहेत. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, वैजनाथ देवकते, श्रीकांत पाटील, अब्दुल सईद, श्रीराम जाधव, डिगांबर खरवडे, अंगद सोगे, शेख रहीम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### एचएआरसी तर्फे २० गरजू मुलींना स्वेटर्स वाटप; 'प्रकाशवाटा' समूहातून लोकसहभाग

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अॅन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील २० गरजू मुलींना स्वेटर्स वाटप करण्यात आले.

जिल्ह्यात वाढलेल्या कडाक्याच्या थंडीच्या पार्श्वभूमीवर होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अॅन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे एकल पालक व अनाथ मुला-मुलींसाठी स्वेटर वाटप उपक्रमाला मंगळवार (दि.१८) पासून सुरुवात करण्यात आली. परभणीतील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासह पूर्णा, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी, जिंतूर येथील निवासी वसतिगृहांमध्ये तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे २०० विद्यार्थ्यांना थंडीपासून बचावासाठी स्वेटर्सचे वितरण केले जाणार आहे. उपक्रमाची सुरुवात परभणी येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील २० गरजू मुलींना स्वेटर्स देऊन करण्यात आली. यावेळी एचएआरसी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, डॉ. आशा चांडक, पद्मा भालेराव, अंजली जोशी, मानसी लांबे, अनंत लांबे, मंजुषा देशमुख, लीना भालेराव तसेच शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.

दरम्यान, या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उभारण्यासाठी एचएआरसी संस्थेने 'प्रकाशवाटा' या व्हॉट्सॲप समूहाच्या माध्यमातून लोकसहभागाचे आवाहन केले होते. नागरिकांनी या आवाहनाला प्रतिसाद देत दिलेल्या सहकार्यामुळे स्वेटर्स खरेदी करून गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. या उपक्रमासाठी प्रा. डॉ. शिवा आयथळ, प्रमोद इरूमले, पंकज चांडक, आनंद बाहेती, श्रीकृष्ण कातणेश्वर, सत्यंजय हर्षे, नितिन देशमुख, किरण कडे, अंबरेश्वर राठी यांसह अनेकांनी सहकार्य केले.

### परभणी जिल्हयात वाढली थंडी

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हयात थंडीचा पारा चांगलाच वाढला आहे. त्यामुळे अनेकांना या थंडीपासून बचाव करण्यासाठी अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागत आहे. त्यातच आपण अनेक गोष्टी सहन करतो परंतू वातावरणाचा परिणाम आपल्याला सहन करावा लागत आहे. त्यामुळेच जिल्हयात थंडी वाढलेली आपणास दिसून येत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**


९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मा. ना. मेघनादीदी बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून सोरजा मोहखेड गावचा विजेचा प्रश्न कायमचा सुटला

**रामेश्वर कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** आज दिनांक १८/११/२०२५ रोज मंगळवार रोजी इटोली येथील ३३ वीज उपकेंद्रातून सोरजा, मोहखेड, गडदगव्हाण, वाडी,तांडा, तसेच डोंगरतळा, मांडवा, खरदडी, घेवंडा या गावाकरिता दोन वेगवेगळे फिडर काढण्यात आले आहेत.

वरील सर्व गावातील शेतकरी वर्षानुवर्षांपासून लाईट करिता त्रस्त होते. रात्री अपरात्री लाईट साठी शेतात जागरण करावं लागायचं. तसेच जीवाची परवा न करता रात्री लाईट साठी इटोली ला जावं लागायचं. शेतकऱ्यांनी आपली व्यथा मा. रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या कडे मांडली. मा. साहेबांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला आणि मा. ना. मेघना दिदी यांच्या माध्यमातून सोडवाला. सदरील फिडरचे आज भा. ज. पा. तालुकाध्यक्ष गोविंद भाऊ थिटे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सुंदरराव चव्हाणहे होते, या प्रसंगी मा. मेघनादीदी यांचे स्वीय सहायक बाबासाहेब खेत्रे, अविनाशजी काळे,डॉ. देवराव कऱ्हाळे, लोभाजी नाईक, जगदीशजी घुगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश तडकसे, बालाजी सांगळे, उमाकांत घळे, संतोष आढे, निवास घुगे, सर्जेराव नरवाडे, मोकिंदराव भालेराव, पदमाकर भालेराव, बाबुसाहेब शेळके,आश्रोबा चव्हाण, शालिकराम गडदे, गजानन हाके, माणिक आढे, गजानन गायकवाड, कांताप्पा टिळकरी व पंचक्रोशीतील सर्व गावचे सरपंच माजी सरपंच, भा. ज. पा. चे सर्व पदाधिकारी आणि सर्व गावाचे लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. फिडर चे काम झाल्यामुळे सर्व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहण्यास मिळाले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज तोडकर यांनी केले.



## परभणीसाठी अमृत २.० अंतर्गत रु. ५६५ कोटींच्या पायाभूत प्रकल्पांना मंजूरी
## मलनि:स्सारण प्रकल्पाकरीता रु. ४०८ कोटी, तर पाणीपुरवठा प्रकल्पासाठी १५७ कोटी

**परभणी ,/प्रतिनिधी:** परभणीसाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत परभणी महानगरपालिकेच्या सुमारे रु. ४०८.८३ कोटींच्या मलनि:स्सारण प्रकल्पास आणि रु. १५७.११ कोटींच्या पाणीपुरवठा प्रकल्पास अशा एकूण रु. ५६५.९४ कोटींच्या पायाभूत प्रकल्पांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. नगरविकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय आज जारी केला आहे. या प्रकल्पामुळे परभणी शहराच्या पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनात मोठी सुधारणा होणार आहे. पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी याबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, परभणी महानगरपालिकेसाठी अमृत २.० अंतर्गत मंजूर झालेल्या रु. ५६५.९४ कोटींच्या दोन प्रकल्पांमुळे शहराच्या विकासात भर पडणार आहे. पाणीपुरवठा प्रणाली मजबूत करणे आणि



आधुनिक मलनि:स्सारण (भूमीगत गटार) सुविधा उभारणे ही काळाची गरज होती. शासनाने दिलेल्या या प्रशासकीय मान्यतेमुळे शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि सातत्यपूर्ण पाणीपुरवठा मिळेल. परभणीकरांच्या दीर्घकालीन पाणी समस्येचा कायमस्वरूपी निपटारा करण्यासाठी हा प्रकल्प मोठा दिलासा देणारे पाऊल ठरणार आहे. आधुनिक जलपुरवठा यंत्रणा, शुद्ध पाणी उपलब्धता आणि भविष्यातील गरजांनुसार मजबूत सुविधा या प्रकल्पातून उभारल्या जाणार आहेत. तसेच मलनि:स्सारण व्यवस्था सुरक्षित आणि टिकावू केली जाणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे परभणीच्या आरोग्यदायी शहरी विकासाला गती मिळेल, प्रदूषण नियंत्रणास मदत होईल आणि पुढील काही वर्षांमध्ये शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुणवत्ता वाढ दिसून येईल. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानातंर्गत मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या रु. ४०८.८३ कोटींच्या रकमेत केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ३३.३३ टक्के) रु. १३६.२६३ कोटी, राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ३६.६७ टक्के) रु. १४९.९१८ कोटी आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ३० टक्के) रु. १२२.६४९ कोटी इतका वाटा असणार आहे. तर पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या रु. १५७.११ कोटींच्या रकमेत केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ३३.३३ टक्के) रु. ५२.३६४८ कोटी, राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ३६.६७ टक्के) रु. ५७.६१२२ कोटी आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ३० टक्के) रु. ४७.१३३० कोटी इतका वाटा असणार आहे.

या प्रकल्पांमुळे परभणीतील पाणीपुरवठा व मलनि:स्सारण व्यवस्थापन आणि पर्यावरणीय गुणवत्ता यात मोठी सुधारणा होणार असून परभणीकरांसाठी ही दिलासादायक बाब आहे.

### बाबुराव दराडे यांचे निधन



**परभणी,/प्रतिनिधी-** बाबुराव दराडे यांचे निधन लिंबाळा येथील वारकरी संप्रदायातील ह भ प बाबुराव किशनराव दराडे वय ८० वर्षे यांचे मंगळवारी रात्री दीर्घ हजाराने निधन झाले त्यांच्या अंत्यविधी बुधवारी सकाळी नऊ वाजता लिबाळा येथील शमशानभूमीमध्ये करण्यात आला यावेळी गावातील नागरी व आजूबाजूचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परभणीत राज्यस्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय १४ वर्षाखालील मुला-मुलींची शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा १७ ते १९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे आयोजित या स्पर्धा आज संपन्न झाली.

या क्रीडा स्पर्धेत राज्यातील अमरावती, लातूर, नागपूर, कोल्हापूर, मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या आठ विभागांतील ०८ मुलांचे व ०८ मुलींचे असे एकूण १६ संघ सहभागी झाले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सहसंचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य चंद्रकांत कांबळे हे होते तर प्रमुख पाहुणे सरचिटणीस महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, छत्रपती पुरस्कार विजेते, महाराष्ट्र ऑलम्पीक असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. चंद्रजित जाधव, संचालिका ज्ञानसाधना प्रतिष्ठान शितल किरण सोनटक्के आणि जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. यात मुलांच्या गटामध्ये पुणे विभागाला नमवत लातुर विभागाने राज्यस्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत ०३ गुणांने आघाडी घेत प्रथम क्रमांक पटकावत आपले वर्चस्व निर्माण केले तर मुलीच्या गटात पुणे गटाला कोल्हापुर विभागाने ०६ गुणाने नमवत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले.

अंतीम निकाल पुढील प्रमाणे : मुले - प्रथम- लातुर विभाग,द्वितीय - पुणे विभाग,तृतीय - परभणी विभाग,उत्कृष्ट संरक्षण - विक्रमसिंह राठोड पुणे,उत्कृष्ट आक्रमण - प्रफुल्ल वसावे लातुर,अष्टपैलू खेळाडू - सुरेश वसावे लातुर,मुली प्रथम - कोल्हापुर विभाग,द्वितीय - पुणे विभाग, तृतीय - लातुर विभाग,उत्कृष्ट संरक्षण ऋतुजा सुरवसे पुणे, उत्कृष्ट आक्रमण - पायल तामखडे कोल्हापुर, अष्टपैलू खेळाडू - अनुष्का तामखेडे कोल्हपुर,बक्षीस वितरण प्रसंगी प्रथम क्रमांक प्राप्त दोन्ही संघाला अमोल धाडवे, सौम्या इंटरप्रायजेस, यांच्याकडुन बॅग देण्यात आल्या, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन्ही संघाला कै. रामदास कांबळे, कै. मनोहर साखरे यांच्या स्मरणार्थ पाण्याच्या बॉटल देण्यात आल्या तर तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या संघाला कै. कलाबाई कांबळे, कै. मंदाकिनी साखरे यांच्या स्मरनार्थ स्किपिंग रोप देण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील कल्याण पोले, तालुका क्रीडा अधिकारी, मिलिंद साळवे, तालुका क्रीडा अधिकारी, सुयश नाटकर, क्रीडा अधिकारी, रोहन औढेकर होते.

## सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी १५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत एस.एस.बी. कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात आला आहे.
प्रशिक्षणार्थींनी केंद्रामध्ये पोहोचण्याची तारीख १४ डिसेंबर २०२५ सकाळी १० वाजता राहील. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. परभणी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे ०७ डिसेंबर २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे, मुलाखातीस येते वेळी त्यांनी डिर्पाटमेंट ऑफ सैनिक वेल्फेअर, पुणे (डीएसब्लू) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील एस.एस.बी. ६४ कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.
सदर एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झमिनेशन अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झमिनेशन पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शनबोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणालीसाठी एस.एस.बी. कॉल लेटर असावे किंवा एस.एस.बी. साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे यापैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत आणावे.
अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी : .. व दूरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र.९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अनुराधा ढालकरी यांनी केले आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित एकता पदयात्रेस परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी ,/प्रतिनिधी-** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परभणी शहरात आज (दि. १९) सकाळी भव्य एकता पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेस विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारत माता की जय, वंदे मातरम् या देशभक्तीपर घोषणांनी शहर दुमदूमून गेले.

यावेळी आयोजित कार्यक्रम प्रसंगी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारतासाठी 'एकता' हा मंत्र जनमानसात दृढ व्हावा. तसेच देशाची सर्वांगिण प्रगती व एकतेसाठी विद्यार्थ्यांनी मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या सक्षम राहून परिश्रमाची तयारी ठेवावी, असे आवाहन केले.

तर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी आपल्या भाषणात एकतेचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल आहेत. जाती-धर्म, प्रदेश किंवा भाषा यापेक्षा वर जाऊन "आपण सर्वप्रथम भारतीय आहोत" ही शिकवण त्यांनी देशाला दिली. देशाबद्दल अभिमान व गर्व बाळगणे ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत जबाबदारी आहे. देश प्रथम ही भावना मनामनात रुजविणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे, असे सार्थ उदगार व्यक्त केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, एनएसएस व एनसीसी आणि भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत मेरा युवा भारत (माय भारत) यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी ८.०० वाजता विद्यापीठाच्या शेतकरी भवन मैदान येथून वसमत रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत एकता पदयात्रा निघाली. पदयात्रेचा समारोप जिल्हा क्रिडा संकुल येथे झाला.

या पदयात्रेसाठी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. (डॉ) इन्द मणि हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांनी पदयात्रेस हिरवा




झेंडा दाखवून शुभारंभ केला. स्वतः ते पदयात्रेत सहभागी झाले. कार्यक्रमास विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ भगवान आसेवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी शशांक रावुला, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती गीता साखरे, उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांना नशामुक्तीची तर कुलगुरुंनी आत्मनिर्भर भारत संकल्प स्वदेशीची उपस्थितांना शपथ दिली.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना 'एकता, जिद्द आणि प्रगती'चा संदेश दिला. ते म्हणाले की, सरदार पटेल हे भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात. ते दक्ष, दूरदर्शी आणि इंग्रजी भाषेतील प्रभुत्वामुळे अत्यंत प्रभावी संवादक असलेले बॅरिस्टर होते. त्यांच्या इंग्रजी संवादकौशल्यामुळे ते लॉर्ड माउंटबॅटनपेक्षाही प्रभावी होते. विद्यार्थ्यांनी सरदार पटेलांच्या जिद्दीचा, कार्यतत्परतेचा आणि व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिकोनाचा आदर्श घ्यावा. मराठवाडा मुक्ती संग्राम आणि संस्थानांच्या विलीनीकरणातील सरदार पटेलांचे अद्वितीय योगदान राष्ट्र एकसंघ करणारे ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पदयात्रेमुळे सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी 'एकता' हा मंत्र जनमानसात दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र णि यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अखंड भारताची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सरदार पटेल यांनी केलेले अद्वितीय राष्ट्रनिर्माण कार्य आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.

देश प्रथम ही भावना मनामनात रोवण्यासाठी त्यांचे योगदान अमूल्य असून, त्यांच्या आदर्शांवर चालणे ही खरी देशसेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश शिंदे यांनी केले तर आभार विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांनी मानले. या पदयात्रेत विद्यापीठाच्या एनसीसीचे आणि सर्व महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थी यांच्यासह शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

# छाननीनंतर नगराध्यक्षपदासाठी हिंगोलीत ९, कळमनुरीत १४ तर वसमतमध्ये १२ उमेदवार निवडणुक रिंगणात

## बंडखोरांना थंड करण्यासाठी राजकीय हालचालींना वेग, दुरंगी, तिरंगी आणि बहुरंगी निवडणुकांचे चित्र

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुकीत उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात आली. छाननीनंतर हिंगोलीत नगराध्यक्षपदासाठी ९, कळमनुरीत १४ तर वसमतमध्ये १२ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. दि २५ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेतल्यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान सर्वच राजकीय पक्ष पक्षातील बंडखोरांना थंड करण्यासाठी जोरदार हालचाली करीत असून त्यांचे प्रयत्न कितपत यशस्वी होतात हे दि २५ नंतरच समजणार आहे. यावेळी काही प्रभागात दुरंगी, तिरंगी तर कुठे बहुरंगी लढती होण्याचे संकेत आहेत.

मंगळवारी उपविभागीय कार्यालयात उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या उपस्थितीत नगर पालिका उमेदवारांची छाननी करण्यात आली. यावेळी विरोधी उमेदवारांच्या अर्जावर आक्षेपही घेण्यात आले होते. त्यानंतर निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेवून निकाल दिला.

छाननीनंतर नगराध्यक्षपदासाठी वैध झालेले उमेदवार रेखा श्रीराम बांगर, नीता बाबाराव बांगर, अमीनाबी शेख अजीज प्यारेवाले, वसंताबाई पांडुरंग लुंगे, शेख समिना बेगम मोहम्मद मतीन, अर्चना श्रीराम भिसे, बेग नेहा बेगम मुसा, सारीका अभिजीत अवघड यांचा समावेश आहे. तर नगरसेवक पदासाठी प्रभाग १ अ मधून शोभा अशोकराव कळासरे, उषाबाई दलीत धबाले, ज्योती अमोल वाघमारे, सुनीता विठ्ठल सुर्यवंशी, पंचशीला गौतम जावळे, भारतीबाई प्रभाकर थोरात, प्रभाग १ ब मधून माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, आशिष कचरूलाल जयस्वाल, चंद्रशेखर श्रीरामअप्पा उबाळे, विशाल राजेंद्र देशमुख, प्रभाग २ अ मधून निर्मला विजय पुंडगे, राणी अजय गायकवाड, कमलाबाई साहेबराव कांबळे, प्रतिभा चंद्रमुर्ती मांजरमकर, आशा मोहन उबाळे, आरती सतीश भंडारे, प्रभाग २ ब मधून प्यारेवाले बुऱ्हान शेख मुन्नू, यादव ब्रिजलाल नंदलाल, पाईकराव अमोल प्रकाश, प्यारेवाले हमीद पिरू, प्यारेवाले अक्रम भुरे, भगत विशाल जगनलाल, प्रभाग ३ अ मधून गुठ्ठे अनिता उमेश, चौधरी करूणा राधेशाम, पाटील वृषाली उल्हास, होकर्णे नंदिनी शिवानंदअप्पा, यादव रोहीणी सागर, प्रभाग ३ ब मधून नायक नरसिंग विश्वासराव, अग्रवाल राजेश बन्सीलाल, शहाणे कैलास सुर्यकांत, पठाण नहीदखाँ जानीखाँ, पठाण फरोजखान युसुफखान, बायस धिरजसिंअ रणजीतसिंह, मांजरमकर चंद्रमुर्ती मधुकरराव, पठाण शाहीदखान मुजफर खान, प्रभाग ४ अ मधून गोटे वैशाली राजेश, पठाण अमीना उमरखान, गहिलोत मंगलादेवी शंभूसिंग, प्रभाग ४ ब मधून शाहु जितसिंग अर्जंनसिंग, नैनवाणी अनिलकुमार राजकुमार, गहिलोत शंभुसिंह विजयसिंह, पठाण असिमखान नासरखान, वडकुते सुरज कोंडबाराव, प्रभत्तग ५ अ मूधन वाढवे ज्योती शिरीष, इंगळे वंदना कृष्णा, सुर्यतळ अनिता सदाशिव, बलखंडे ज्योती सुखदेव, नरवाडे मयुरी योगेश, तपासे अरूणाबाई दलीतकुमार, प्रभाग ५ ब मधून शेख अकील शब्बीर, पठाण अनवर खान रहेमान खान, दुधडकर विशाल शिवशंकर, पठाण कय्युम खान मस्तान खान, पठाण फेरोज खान युसुफ खान, खंदारे मनोज शंकर, खुराणा वीणा जगजीतराज, शेख जाकीर शब्बीर, प्रभाग ६ अ मधून पाटील मीना देवराव, माने चंद्रकला शामराव, जमदाडे शिलाबाई प्रकाशराव, लुंगे वसंताबाई पांडुरंग, शेख मोहसिनाबेगम ताहेर, प्रभाग ६ ब मधून शेख जुबेर युसुफ, दुबे केशव जयप्रकाश, राठोड सुनील सुभाष, पठाण कलीम खान खलील खान, सय्यद आमेरअली मीर मसुद अली, गव्हाणे अशोक विठ्ठल, पठाडे शुक्लोधन काशीराम, खंदारे अभिजीत दिलीप, प्रभाग ७ अ मधून पठाण नसीमबेगम हमीद खान, दुन्हा जावेद जाकीर, दुल्हा सुमय्या जावेद, पठाण साजीया आवेसखान, सराफ रितीका सराफ सुरेशअप्पा, प्रभाग ७ ब मधून दुबे सुमन गोपाल, बगडीया नीता मनीष, शेख नमीरा नाज शेख अरशद, पठाण हिना रिजवान, शेख निखत बानो नफीस, शेख आयशिया बेगम आरेफ, पठाण शमीर बेगम गफारखान, प्रभाग ८ अ मधून चौधरी सुरभी भरत, शेख समरीन तब्बसुम मोहम्मद साजीद, राठोड आश्विनी नितीन, प्रभाग ८ ब मधून बाहेती प्रशांत दिलीप, खंडेलवाल कपील जुगलकिशोर, जयस्वाल अंकुश शरद, व्यास सुरज नंदकिशोर, मुदीराज शुभम राम, कुरील लखन फकीरचंद, प्रभाग ९ अ मधून लव्हाळे इंदुबाई नंदकुमार, कुटे ज्योती प्रमोद, प्रभाग ९ ब मधून बागवान अब्दुल माबुद शिकुर, काळे विजय राजु, वाघ प्रणय दिपक, प्रभाग १० अ मधून बांगर श्रीराम लक्ष्मण, बांगर साई शिवाजी, प्रभाग १० ब मधून गोटरे सोनाली विशाल, श्रीनाथ गीताबाई कचरू, प्रभाग ११ अ मधून बनसोडे लिंबाजी संभाजी, सुतारे राजू गजानन, लांडगे पंचफुलाबाई नारायणराव, वाढे रवींद्र तुकाराम, बोरकर श्रीकांत किशनराव, साबळे संतोष दशरथ, प्रभाग ११ ब मधून बांगर अरूणा पांडुरंग, बागर सुनीता गणेश, जयस्वाल समिता सचिन, शेख फरीदाबी इमरान, बोलोलु अश्लेषा रवी, पठाण रिजवान बेगम सफदर, पठाण सईदा बेगम सत्तार, कानवाळे चंद्रकलाबाई सुभाष, बांगर कुसुमबाई मोतीराम, प्रभाग १२ अ मधून बांगर सुभाष नारायणराव, बांगर विश्वासराव दगडुजी, बांगर माधव दत्ताराव, प्रभाग १२ ब मधून बांगर ज्योती रामकिशन, कल्पना सचिन बांगर, बांगर आश्विनी माधवराव, प्रभाग १३ मधून शेख समरीन तबसुम मोहम्मद साजीद, मोहम्मद रूबीना वाजीद, सय्यद सय्यदा आफरीन फिरदोस नासेर अली, शेख सना परवीन नाजीम, प्रभाग १३ ब मधून शेख निहाल हाजी इस्माईल, सय्यद फहेद अली सय्यद सादीक अली, शेख फयाज इस्माईल, सय्यद मुक्तरोद्दीन अजिजोद्दीन, शेख फिरोज शेख रफीक, प्रभाग १४ अ मधून शेख अंजूम बेगम शेख मुजीब, शेख समरीन शमी शेख, शेख साहेराबेगम आजम, प्रभाग १४ ब मधून सय्यद जुनेद सय्यद खलील, हाशमी स बासीत हाशमी स हबीब, धुळे आनंदा राजाराम, बागवान शेख मुन्तजीब शेख मौला, शेख सद्दाम हुसेन खमर शेख, शेख चांद शेख मुन्नू, प्रभाग १५ अ मधून कांबळे सुमीत दत्तराव, भुक्तर सुनील राजकुमार, खंदारे कौसाबाई बाबाराव, पाईकराव किरण विजयराव, डाखोरे अक्षय बबन, उरेवार भगवान गणपत, संतोष गंगाराम खिल्लारे, प्रभाग १५ ब मधून बांगर शशीकलाबाई माधवराव, सय्यद करीमुनीसा शमशोद्दीन, जाधव रंजना बाबुराव, बागवान जिनतबेगम शेख आरीफ, आबेदा बेगम शेख बशीरोद्दीन, हिना परवीन शफी खान पठाण, प्रभाग १६ अ मधून गोरे निधी संजय, मेटकर रंगुबाई मारोती, प्रभाग १६ ब मधून कदम शाम अंबादासराव, बांगर धनंजय शिवाजी, बांगर भास्कर रंगनाथ, प्रभाग १७ अ मधून कुरेशी साद अहेमद मो अब्दुल कुद्दुस, सय्यद जावेद बाबु, सोनुळे गजानन काशीराम, बेग वाजीद मुसा, प्रभाग १७ ब मधून पठाण नाजीया परवीन अफरोज, शेख नजीमा बेगम शकील शेख, शेख मेहनाज फातीमा अतीक, सय्यद नाजनीन जावेद, पठाण नाजीया परवीन जुबेर खान, शेख शफी शेख गुलाम यांचे अर्ज वैध ठरल्यामुळे ते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २५ नोव्हेंबरनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## हिंगोलीत सहकार भारतीच्या सहकारसप्ताला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ नोव्हेंबर**



सहकार भारती हिंगोली जिल्हा कार्यकारिणीतर्फे पदाधिकारी व सदस्यांकरिता सहकार सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

सहकार सप्ताहानिमित्त दिनांक १४.११.२०२५ ते २०.११.२०२५ या कालावधीमध्ये विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. येथील तिरुपतीनगरमधील ओम भवनमध्ये आयोजित कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहकार भारतीचे परभणी जिल्हा संघटन प्रमुख आनंद देशमुख, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हिंगोली ए.डी. गुठ्ठे, सहकार अधिकारी व्ही.ए. गिते, महाराष्ट्र प्रदेश सहकार भारती पतसंस्था सहप्रकोष्ट प्रमुख जनकराज खुराणा, सहकार भारतीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष प्रकाशचंद सोनी, जिल्हा महामंत्री सुनीलकुमार सिन्हा आदी उपस्थित होते.

या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सहाय्यक निबंधक ए.डी. गुठ्ठे यांनी सहकार चळवळीमध्ये वाढ कशा प्रकारे करावी, पतसंस्थेचा कार्यभार चालवताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आनंद देशमुख यांनी सहकार भारतीच्या कार्याबद्दल माहिती व सदस्यता नोंदणी अभियानाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संघटन प्रमुख निलेश लाखकर यांनी केले तर प्रकोष्टप्रमुख ए.एस. पांपटवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. सुरेंद्र साहू, समता अग्रवाल, कुलकर्णी, श्खंडेलवाल, सुधीर मुळे, नितीन कापसे गजानन ढोणे, बालाजी घ्यार,विक्की गोरे, श्रीराम माळोदे, शिवाजी जांभळे, संजय घोडेकर, संदीप पाटील, संजू बनसोडे, डिगांबर टाक, नामदेव शिंदे, नामदेव थोरात आदी उपस्थित होते.



**हिंगोली– रेल्वे विभागाच्यावतीने मागील दोन ते तीन वर्षापासून १५ कोटी रूपये खर्च करून रेल्वे उड्डाण पुलाच्या खालील अंडरग्राउंड रस्त्याचे काम करण्यात आले. रस्ता पूर्णपणे तयार झाल्यावरही आचारसंहितेमुळे उद्घाटन लांबणीवर पडत होते. अखेर कंत्राटदारानेच उद्घाटन करीत शहरात जाण्यासाठी आता पर्यायी मार्ग खुला झाल्यामुळे नागरिकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे. छाया– विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### सांदीपनीमध्ये बिरसा मुंडा जयंती साजरी



हिंगोली– सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु) नांदेड येथे बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर शिक्षकांनी आपल्या भाषणातून बिरसा मुंडा यांचे इंग्रजांविरुद्धचे संघर्षमय जीवन, आदिवासी समाजासाठी केलेले कार्य आणि त्यांच्या प्रेरणादायी विचारांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रित कौर, प्रशासक मारुती मेखाले आणि शैक्षणिक सल्लागार केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला आणि विद्यार्थ्यांना बिरसा मुंडा यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली.

### कोनाथा येथे खुल्या वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन



वसमत– तालुक्यातील कोनाथा येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दिनांक २६-११-२५ बुधवारी, सांस्कृतिक भवन कोनाथा येथे करण्यात येणार आहे अशी माहिती कोनाथा सरपंच राजरतन सुभाषराव कुंटे यांनी दिली आहे. माध्यमिक स्तर व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी साठी स्पर्धेचे आयोजन केले आहे, स्पर्धेचा विषय तरुणांना राजकारणातील संधी प्रत्येक महाविद्यालय केवळ एक विध्यार्थी या स्पर्धेसाठी पात्र असेन संबंधित स्पर्धाकाने प्राचार्य चे पत्र आणणे बंधनकारक असेन, प्रथम द्वितीय तृतीय अनुक्रमे ५००० रूपये, ३००० रूपये, २००० रूपये प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देण्यात येणार असून स्पर्धेची नाव नोंदणी जि. प.शाळा मुख्यद्यापक बेग– ८४५९४९०२९०, ग्रामविकास अधिकारी– ८७६६८७३६०४,उपसरपंच–८८५६८८३८८४, रोजगार सेवक– ९९२१९७५२२९, पत्रकार बेंडे–९७६७४२६०११ इत्यादी नंबर वर अधिक माहिती साठी संपर्क साधावा असे आवाहन सरपंच कुंटे यांनी केले आहे.

## निवडणुक प्रशिक्षणास अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, १९ नोव्हेंबर**

येथील तहसील कार्यालयात नगर पालिका निवडणुकांसंदर्भात अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास १२ कर्मचारी अनुपस्थित राहीले. या कर्मचाऱ्यांना निवडणुक विभागाच्यावतीने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

कळमनुरी नगर पालिका निवडणुकीसाठी दि १८ नोव्हेंबर रोजी मतदान अधिकारी, केंद्राध्यक्ष यांचे प्रशिक्षण येथील तहसील कार्यालयात तहसीलदार जीवककुमार कांबळे, मुख्याधिकारी रविराज दरक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आयोजित करण्यात आले होते. शहरातील २७ मतदान केंद्रासाठी १६२ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होते. यावेळी प्रशिक्षणाला १५० कर्मचारी उपस्थित होते. १२ कर्मचारी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

## नगरपालिका निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज– कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ नोव्हेंबर**



आगामी वसमत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर वसमत शहरात संपूर्ण शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आज दिनांक १८ नोव्हेंबर २०२५, मंगळवार रोजी सकाळी ११.३० वाजता वसमत शहर पोलिस स्टेशनमध्ये शांतता समितीची महत्त्वपूर्ण आणि तातडीची बैठक संपन्न झाली.

ही बैठक हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. निवडणूक काळ हा संवेदनशील असल्याने शहरात शिस्त, सुरक्षितता व सौहार्द राखण्यासाठी काटेकोर खबरदारीचे निर्देश बैठकीत देण्यात आले. बैठकीदरम्यान शहरात कोणत्याही प्रकारची गोंधळाची किंवा गैरसमजाची परिस्थिती निर्माण होऊ नये, राजकीय मतभेदांमुळे संघर्ष, वाद किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडविणाऱ्या घटना टाळण्यासाठी सर्व समाजघटकांनी सजग रहावे. फेक न्यूज, भडकावू संदेश, व्हायरल व्हिडिओ यांवर सायबर सेल ची कडक नजर व कारवाई केली जाणार मतदानाच्या काळात गस्त वाढविण्यासह पोलिस दलाची विशेष तैनाती करण्यात येणार, निवडणुकीत कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर आकर्षण, दबाव किंवा धमकीचे प्रकार आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी.

या बैठकीसाठी वसमत शहरातील सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी, माजी व भावी नगराध्यक्ष/माजी व भावी नगरसेवक, आगामी निवडणुकीतील नगरसेवक उमेदवार, व्यापारी वर्ग, सर्व पत्रकार बांधव आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिक यांना उपस्थित होते. निवडणूक हा लोकशाहीचा पवित्र उत्सव असून, तो शांततेत आणि निःपक्षपाती पद्धतीने पार पडण्यासाठी पोलिस प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे या बैठकीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले.

## माय भारत केंद्र युवकांसाठी दिशादर्शक– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील 'माय भारत केंद्र' हे युवकांसाठी दिशादर्शक ठरणारे असून या संधीचा लाभ युवा वर्गाने घेऊन राष्ट्रीय स्वाभिमान व एकात्मता साधून आत्मनिर्भर भारत निर्माण करावा, असे उद्गार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी काढले.

येथील माय भारत केंद्राच्या वतीने एकात्मता युनिटी मार्च पदयात्रेतून एकतेचा जयघोष, राष्ट्रीय अभिमान आणि स्वावलंबनाचा संदेश घेऊन येथील जिल्हाधिकारी कार्यालयातून पदयात्रेचा प्रारंभ करताना जिल्हाधिकारी गुप्ता बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, माय भारत केंद्राचे आदर्श युवा पुरस्कार्थी पत्रकार डॉ.विजय निलावार, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, समाजसेविका सुनीता मुळे मंचावर उपस्थित होते.




स्वागतपर प्रास्ताविकातून केंद्र प्रमुख अनिल ढेंगे यांनी योजनाबद्दल माहिती दिली. पदयात्रेची सुरुवात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केल्यानंतर राष्ट्रीय एकात्मतेची व आत्मनिर्भर भारतची शपथ जिल्हाधिकारी गुप्ता तर व्यसन मुक्तीची शपथ जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी उपस्थित युवक-युवतींना दिली. ही पदयात्रा शिवाजीराव देशमुख सभागृहात पोहचली.त्यानंतर जिल्हाधिकारी गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक कोकाटे, डॉ. विजय निलावार, क्रीडा अधिकारी मारावार, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा प्रमुख प्रा.डॉ.पवन वासनिक, प्रा.किशोर इंगोले, प्रा.डॉ.सुधीर वाघ आदींच्या हस्तेसांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्धाटन प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

राष्ट्रीय पातळीवर हिंगोली माय भारत केंद्राच्या माध्यमातून युवकांनी मजल मारली असून भविष्यातही हिंगोली जिल्ह्याचे नावलौकिक करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी करून शुभेच्छा दिल्या. १९९३ ला मला या केंद्राने आदर्श युवा पुरस्काराने सन्मानित केले. त्यानंतर राज्य आणि केंद्र शासनाच्या अनेक पुरस्काराचा मानकरी ठरलो तसे तुम्हा युवक-युवतींबाबत या उपक्रमातून व्हावे, अशा शुभेच्छा देऊन डॉ. निलावार यांनी अपेक्षा व्यक्त केल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमात युवक युवती नि सांघिक व वैयक्तीक रंगदार उत्स्फूर्त कला प्रदर्शन केले. प्रथम पारितोषिक भारतीय विद्या मंदिरच्या ललाटी भंडारा, गोंधळ या नृत्याला, द्वितीय अनुसया विद्या मंदिरच्या अंबाबाई गोंधळाला यावे या उपक्रमाला, तिसरे पारितोषक तिसरे सरजुदेवी भिकुलाल भारूका विद्यालयातील लावणी नृत्याला, उत्तेजनार्थ कु.माही घुगे, हर्षदा कुगावकर याना स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व मेडल्स देऊन मंचावरील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

या सर्व उपक्रमात व कार्यक्रमात हिंगोली जिल्हा स्काऊट गाईडचे स्वयंसेवक व प्रमुख माधुरी दळवी, सरजुदेवी भारुका विद्यालयाचा एन.सी.सी.कॅडेट व विभाग प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना, आदर्श महाविद्यालय, न्यू मॉडर्न कॉलेज, खाकीबाबा इंग्लिश स्कूल, भारतीय विद्यामंदिर, अनुसया विद्या मंदिर, शिवाजी महाविद्यालय हिंगोलीचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि समन्वयक, संडे ऑन मॉर्निंग सायकलिंग ग्रुप सह राष्ट्रप्रेमी नागरिक मेरा युवा भारत केंद्राचे प्रवीण पांडे, क्रीडा विभागाचे आत्माराम बोथीकर आदी सर्व निमंत्रित सहभागी झाल्याने कार्यक्रम यशस्वी झाल्याचे केंद्र प्रमुख अनिल ढेंगे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.किशोर इंगोले यांनी केले. शेवटी सामूहिक वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.